॥श्री राम समर्थ॥
॥श्री नागनाथ प्रसन्न॥
महेश गायकवाड
मो. ९७६७०४०८४३
७७४१०८४५४५
श्री शारदा रोपवाटिका
टोमॅटो, मिरची, वांगी, फ्रेंडू, कलिंगड, खरबूज, कोबी, फ्लॉवर, शिमला मिरची, ऊस-८६०३२, २६५, पपई (७८६),पपई आइस बेरी इ.
आमच्याकडे वरील सर्व जातीची ट्रे मधील व गादी वाफ्यावरील दर्जेदार रोपे तसेच ग्रॅण्ड-जी ९ केळी रोपे शोभेची झाडे योग्य दरात मिळतील.
सोलापूर-पुणे रोडवर, मोहोळ, कृषी विज्ञान केंद्राच्या पाठीमागे, मोहोळ.

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

विकास वॉटरप्रुफिंग
घर व बंगला गळतीपासून राहील आता दूर... तेही वर्षानुवर्ष
विकास वॉटरप्रुफिंग घेऊन आले आहे नवीन टेक्नॉलॉजी, केमिकलद्वारे गॅरेंटीने लिकेच थांबवली जाते.
संपर्क : M- 9067317011 / 7387644827

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २०४ वा | गुरुवार, दि. १९ मार्च २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# राज्यातील सर्वात मोठा महसूल घोटाळा आला समोर

## महसूल विभागात कोट्यवधींचा घोटाळा
## दीड-दोन लाख शेतकऱ्यांची गळचेपी
## मंत्री चंद्रशेखर बावनकुळेंकडून कबुली

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्याच्या महसूल विभागात खळबळ उडवून देणारा एक मोठा गैरप्रकार समोर आला आहे. जमिनीचा सर्वात महत्त्वाचा दस्तऐवज असलेल्या ७/१२ (सातबारा) उताऱ्यात फेरफार करून तब्बल एक ते दीड लाख शेतकऱ्यांची फसवणूक झाल्याची धक्कादायक कबुली खुद्द सरकारने दिली आहे. महाराष्ट्र जमीन महसूल कायद्याच्या कलम १५५ चा चुकीचा अर्थ लावून महसूल अधिकाऱ्यांनी हे बेकायदेशीर आदेश पारित केल्याचे उघड झाले आहे.

जमीन महसूल कायद्यातील कलम १५५ चा वापर प्रामुख्याने ७/१२ उताऱ्यावरील 'लेखनदोष' किंवा 'शुद्धलेखनातील चुका' दुरुस्त करण्यासाठी केला जातो. मात्र, पुणे जिल्ह्यात काही महसूल अधिकाऱ्यांनी या कलमाचा गैरवापर करून जमिनीच्या मालकी हक्कांतच परस्पर बदल केले.



जुलै-ऑगस्ट २०२५ दरम्यान हा प्रकार उघडकीस आला.

आमदार अनिल परब यांनी या गंभीर विषयाकडे लक्ष वेधल्यानंतर महसूल विभागात मोठी खळबळ उडाली. या प्रकरणाची व्याप्ती लक्षात घेता विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली एक चौकशी समिती नेमण्यात आली होती.

विभागीय आयुक्तांनी सादर केलेल्या अहवालात महसूल प्रशासनातील भोंगळ कारभाराचे वाभाडे काढण्यात आले आहेत. अनेक प्रकरणांत मूळ मालकाची संमती नसतानाही ७/१२ मध्ये बदल करण्यात आले. नियमबाह्य पद्धतीने बेकायदेशीर आदेश पारित करून खाजगी हितसंबंध जपले गेले. जमिनी बिगरशेती (NA) करताना आणि मालकी हस्तांतरित करताना गंभीर अनियमितता आढळली.

**अनिल परब काय म्हणाले?**

"महाराष्ट्रात भ्रष्टाचारात कुणाला पहिला नंबर द्यायचा? याची स्पर्धा लागली आहे. कुठलं खातं दोन नंबरला ठेवायचं? यासाठी सरकारने परराज्याच्या लोकांनी एसआयटी ठेवावी लागेल. कारण या राज्यातील लोकांना जे अधिकार दिले जातात त्याचा गैरवापर कसा केला जातो ते सांगणारी ही लक्षवेधी आहे. या लक्षवेधीमध्ये जे अधिकारी महसूल कायद्याने दिले जातात. त्यामध्ये कलम 155, 182, 220 ही अशी वेगवेगळी कलम दिली आहेत. या कलमानुसार अधिकाऱ्यांना काही वेगळे स्पेशल अधिकार दिले आहेत. यामध्ये नोंदीत फेरफार करायची असेल तर ते अधिकार आहेत. पण या अधिकारामुळे बऱ्याच अभिलेखांमध्ये चुका होतात. या चुका दुरुस्ती करण्यासाठी वेगवेगळे कमल दिले आहेत."

"155 मध्ये दुरुस्तीचे कलम आहे. कलम 182 मध्ये कसूर करणाऱ्या व्यक्तीची स्तावर मालमत्ता जप्त करण्याचा अधिकार आहे. त्यानंतर कलम 220 मध्ये त्याची नाममात्र बोलीवर खरेदी करणे. या सर्व कलमांतर्गत सर्व अधिकार त्यांच्याकडे आहेत. याचाच अर्थ फेरफार करणार हेच अधिकारी, दुरुस्ती करणार हेच अधिकारी, त्यामध्ये स्थावर मालमत्तेची जप्ती आणणार हेच अधिकारी, त्यावर बोली लावणारे हेच अधिकारी. सगळा माल कुठूनही या खिशातून दुसऱ्या खिशात, म्हणजे महसूल खात्याच्या अंतर्गत सगळा माल अधिकाऱ्यांच्या खिशात जात आहे."

"अशा सगळ्या तक्रारी मोठ्या प्रमाणात झाल्या, सर्वसामान्य शेतकरी तक्रार घेऊन जातो तेव्हा तो रगडला जातो. पण मोठमोठे बिल्डर आणि धनिक असतील, हजारो एकर जमिनी असणारे शेतकरी असतील, अशा लोकांची कामे या सर्व कलमांखाली होत आहेत. म्हणून या कलमांच्याबाबतीत प्रचंड मोठ्या प्रमाणात तक्रारी झाल्या त्यावेळी शासनाने एक समिती गठीत केली. या समितीने मागच्या पाच वर्षात अशी किती प्रकरणे झाली याची चौकशी केली."

(पान 2 वर..)

सुवर्णसंधी! सुवर्णसंधी!
श्री रामेश्वर नगर, मौजे वैराग येथे
वैराग-माढा रोड, शिवाजी नगर, शेजारी. मध्यवर्ती ठिकाणी सर्वोत्कृष्ट लोकेशनला कलेक्टर N.A. खुले प्लॉट विक्रीसाठी उपलब्ध.
1299/- प्रति स्क्वे. फूट
मौजे मार्डी, ता. उत्तर सोलापूर मार्डी-नात्रज डांबरी रोडटच तलावालगतची 11 एकर शेतजमीन विकणे आहे.
9763764949

# रुपाली चाकणकर आता तरी राजीनामा देणार का?

## पवारांच्या राष्ट्रवादीचा सवाल



**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** जोतिष, तंत्र मंत्राच्या नावाखाली महिलेचं शोषण केल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आलेल्या भोंदूबाबा अशोक खरातमुळे रुपाली चाकणकरांच्या अडचणी वाढल्या आहेत. अशोक खरात याची पाद्यपूजा करणाऱ्या रुपाली चाकणकरांनी आता राजीनामा द्यावा अशी मागणी शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे प्रवक्ते विकास लवांडे यांनी केली.

तसेच उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे हे रुपाली चाकणकरांचा राजीनामा घेणार का? असा प्रश्नही त्यांनी विचारला.

अशोक खरातच्या सेवेकरी भक्त असलेल्या आणि कोणत्याही पदावर राहण्याचा नैतिक अधिकार नसलेल्या रुपाली चाकणकर आता तरी महिला आयोगाच्या व पक्षाच्या अध्यक्ष पदाचा राजीनामा देतील का? त्यांचा पक्ष त्यांना किती दिवस पाठीशी घालणार आहे? असा प्रश्न शरद पवारांच्या राष्ट्रवादीकडून विचारण्यात आला.

विकास लवांडे म्हणाले की, "अशोक खरातसारख्या सर्वच भ्रष्टाचारी लोकांना भाजपकडून अभय मिळतंय. महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर या अशोक खरातची पाद्यपूजा करताहेत, त्यांची सेवा करत आहेत. अशोक खरातसोबतचे रुपाली चाकणकरांचे फोटो पाहून खंत वाटते. आता तरी त्या राजीनामा देतील का?"

रुपाली चाकणकरांच्या अनेक चुका या गंभीर स्वरुपाच्या असून त्या आतापर्यंत दडपल्या आहेत. आता या घटनेनंतर तरी त्यांचा राजीनामा घेणार का? असा प्रश्न विकास लवांडे यांनी विचारला.

**आरोपांबाबत मला कल्पना नाही**

दरम्यान, झालेल्या आरोपांवर रुपाली चाकणकरांनी प्रतिक्रिया दिली आहे. (पान 2 वर..)

# भूगोलाचा अभ्यास झाला नसल्यानं पठ्ठ्यानं थेट पेपरचीच केली चोरी

## सांगोला पेपर चोरी प्रकरण!

**सांगोला (कटूसत्य वृत्त):-** सांगोला येथील सांगोला विद्यामंदिर शाळेमधून दोन दिवसापूर्वी चोरीला गेलेल्या भूगोलाच्या 50 प्रश्नपत्रिका आज अखेर पोलिसांना मिळाल्या आहेत. याप्रकरणी दहावीत शिकणाऱ्या एका विधी संघर्ष ग्रस्त अल्पवयीन विद्यार्थ्याची चौकशी केली आहे.

हा सर्व प्रकार उघड झाला आहे. विशेष म्हणजे हे कृत्य करणारा विद्यार्थीही दहावीत शिकत असून याच केंद्रावर त्याचा नंबर होता. आज दहावीच्या भूगोलाच्या पेपरला हा पठ्ठ्याही आला होता. मात्र, पेपर सुटल्यानंतर पोलिसांनी चौकशीसाठी त्याला सोबत घेतल्यावर त्याने या प्रकाराची कबुली दिली आहे.

**इतर पेपर चांगले गेले, मात्र भूगोलाचा अभ्यास झाला नसल्याने पेपर चोरल्याती कबुली**

इतर पेपर चांगले गेले मात्र भूगोलाचा अभ्यास झाला नसल्याने हे पेपर चोरल्याचे त्यांनी कबूल केले. आज पोलिसांनी या अल्पवयीन विधी संघर्ष ग्रस्त बालकाची त्याच्या पालकांसमोर चौकशी केली असता त्याने अनेक गोष्टी सांगितल्या. चोरी करण्यापूर्वी



त्याने या केंद्रावरील स्ट्राँग रूमची चांगली पाहणी करुन घेतली होती. पहाटे दोनच्या सुमारास हा मुलगा इलेक्ट्रिक बाइक वर इलेक्ट्रिक कटर घेऊन शाळेत पोहोचला. त्यानंतर त्याने या स्ट्राँग रूमला लावलेले कुलूप कटरच्या साह्याने कट केले आणि आत जाऊन प्रश्नपत्रिका असलेली ट्रंक उघडली. (पान 2 वर..)

आरोग्यविषयक
मुळव्याध आहे?
ऑपरेशन चा विचार करत असाल तर थांबा ऑपरेशन करून देखील कित्येक जणांचा त्रास पुर्वी पेक्षा भयंकर व उग्र रूप धारण करून पुन्हा उद्भवू शकतो म्हणून प्राचिन भारतीय आयुर्वेदिक अतिशय दुर्मिळ औषधींचा वापर करून बनवलेल्या मुळव्याध मुक्ती औषधांचा वापर करून रक्त पडणे, जखम होणे, कोंब (मोड) यांच्या वेदना, भयंकर आग (जळजळ), असह्य खाज, पचन क्रिया बिघडणे, बद्धकोष्ठता (शौचत्रास, मलावरोध, मलाचे खडे होणे) गॅसेस चा त्रास इ. सर्व समस्यांवर सुरक्षित, दुष्परिणाम रहीत, कायमस्वरूपी इलाजासाठी निः संकोच संपर्क साधावा.
संपर्क :
कुदरत हर्बल्स किल्लारी ता: औसा जि. लातुर
मो.नंबर 9970115450

शिनगारे सिटी वासुद रोड अल्टिमेट जिमच्या समोर सांगोला
प्लॉट देणे आहे
N.A.
3100 sft- 3200 sft
- : संपर्क : -
शिनगारे.जे.एम
8275274353
डी.बी.शिंदे
9579421465

# जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदी दिपक वैद्य, उपाध्यक्षपदी इंद्रजीत पवार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्हा परिषदेच्या नूतन अध्यक्षपदी बाशीर्चे दीपक वैद्य यांची तर सोलापूर जिल्हा परिषदेच्या उपाध्यक्षपदी इंद्रजीत पवार यांची निवड झाली आहे. प्रारंभी जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी निवड जाहिर करून जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य व उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांचा सन्मान करून शुभेच्छा दिल्या. त्यांनतर जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात आज राज्याचे ग्रामविकास व पंचायत राज मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते यांचे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य व उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी आमदार सचिन कल्याणशेट्टी , निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, माजी आमदार राजाभाऊ राऊत, माजी आमदार प्रशांत परिचारक, माजी आमदार राजन पाटील, माजी आमदार राम सातपुते, माजी आमदार दिपक साळुंखे, गटनेत्या रश्मी बागल, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी सुर्यकांत भुजबळ, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मिनाक्षी वाकडे, कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी, राज्य प्रांतिक सदस्य शहाजी पवार , भाजपाचे जिल्हाध्यक्ष शशीकांत चव्हाण, चेतनसिंह केदार, यांचे सह सर्व जिल्हा परिषद सदस्य व विभाग प्रमुख, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



**ग्रामविकास मंत्री अध्यक्ष व उपाध्यक्षांचे दालनात..!**

ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांनी अध्यक्ष दीपक वैद्य व उपाध्यक्ष इंद्रजीत पवार व गटनेत्या रश्मी बागल यांचे कार्यालयात जाऊन त्यांना खुर्चीवर बसवून सन्मानित केले. सिईओ कुलदीप जंगम यांनी देखील अध्यक्ष वैद्य व उपाध्यक्ष पवार यांचे दालनात जाऊन सन्मान केला.

# बोगस हवामान अंदाजकावर गुन्हे दाखल करा

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** स्वयंघोषित हवामान तज्ञ दिशाभूल करणारा अंदाज लावत असल्याने, शेतकऱ्यांना याचा मोठा आर्थिक फटका बसत आहे. यामागे व्यापाऱ्यांचे कटकारस्थान आहे का याचा शोध घेऊन बोगस हवामान तज्ञवर कडक कारवाई करावी व हवामान अंदाज सांगण्यास बंदी करावी, अशी मागणी पंढरपूर तालुक्यातील शेतकऱ्यांनी केली आहे.

पंढरपूर तहसील कार्यालयावर आज शेकडो शेतकऱ्यांनी मोर्चा काढून कारवाई बाबत तहसीलदारांना निवेदन दिले. बोगस हवामान अंदाजक तीन दिवस पाऊस येणार, गारपीट होणार? असा हवामान अंदाज वर्तवत आहेत. त्यामुळे द्राक्षे, डाळींब, पेरु उत्पादक तोडणीला, उतरणीला आलेला शेतीमाल व्यापाऱ्यांना देण्यासाठी धडपड करतात. याचीच संधी साधून व्यापारी कमी दराने माल खरेदी करतात. याचा फटका शेतकऱ्यांना बसत आहे. तर शेतातील गहू, हरभरा, मका, ज्वारी काढणीला आलेल्या शेतकऱ्यांची देखील धांदल उडत आहे. असे असताना सांगीतल्यानुसार पाऊस येत नसल्याने हवामान वर्तवणारे शेतकऱ्यांची मोठी आर्थिक फसवणूक करत असल्याचा शेतकऱ्यांनी केला आहे. याबाबत हवामान अंदाज वर्तवणाऱ्यावर गुन्हे दाखल करावेत अशी मागणी आंदोलकांनी केलीने.



**गुन्हे दाखल करा अन्यथा तीव्र आंदोलन**

चुकीचा हवामान अंदाज वर्तवण्यात येत असल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. व्यापारी दर पाडून शेतीमाल खरेदी करत आहेत. तर पाऊस आलाच तर नुकसान होईल, म्हणून या भीतीपोटी शेतकरी शेतीमाल, फळे विक्री करत आहे. केवळ चुकीचा हवामान अंदाज व्यक्त करण्यात आल्यामूळे हे घडत आहे. त्यामुळे तहसिलदार यांनी दोन दिवसात हवामान अंदाज वर्तवणाऱ्यांवर गुन्हा दाखल करावा, अन्यथा सांगली, कोल्हापूर, सोलापूर येथे शेतकऱ्यांना घेवून तीव्र आंदोलन सुरु करणार आहे. **- मारुती चव्हाण**

पंढरपूर तालुक्यातील द्राक्षे, डाळींब, पेरु, बोर, चिक्कू, उत्पादक शेतकऱ्यांसह गहू, हरभरा, मका, ज्वारी, कडधान्य उत्पादक शेतकऱ्यांनी या मोर्चात मोठ्या संख्येने सहभाग घेतला. तहसिल कार्यालयावर सकाळी 10.30 ते 11.30 या वेळेत आंदोलन करण्यात आले. तहसिलदार सचिन लंगुटे यांना चुकीचा हवमाना वर्तवणाऱ्यावर गुन्हे दाखल करण्याची मागणी करण्यात आली. यावेळी शेतकरी म्हणाले की, सध्या द्राक्षेचा हंगाम सुरु आहे. पेरुचा हंगाम सुरु आहे. ऐन उन्हाळ्यात शेतकऱ्यांनी द्राक्षे, डाळींब, पेरु पिके जोमाने जपली आहे.त त्यांना अपेक्षित दर मिळणे आवश्यक आहे. या फळांना अपेक्षित दर देखील मिळत होता. मात्र, हवामान अंदाज वर्तवणाऱ्यांनी येत्या चार दिवसात मुसळधार पडणार, गारपीट होणार आहे, असा अंदाज वर्तवला. त्यामुळे शेतकऱ्यांनी उतरणीला आलेली द्राक्षे, पेरु व डाळींब विक्री करणे पसंद केले. पयार्याने व्यापाऱ्यांनी देखील हवामानाचा अंदाज गृहित धरुन शेतकऱ्यांकडून कमी दराने द्राक्षे, डाळींब, पेरु खरेदी करण्यास सुरुवात केली आहे. तर तूर, हरभरा, कांदा याचेही दर पाडून व्यापारी मागणी करतात. त्यामुळे एक प्रकारे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. यास चुकीचा हवामान अंदाज वर्तवणारे पंजाबराव डख व इतर कारणीभूत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

अनेक शेतकऱ्यांनी काढणीला येणाऱ्या गहू अगोदरच एक ते दोन आठवडे काढणी केली आहे. त्यामुळे अपरिपक्व व हिरवा गहू काढणीत व मळणीत आला आहे. त्यामुळे बाजारपेठेत व्यापारी दर पाडून मागणी करत आहेत, असा आरोपही शेतकऱ्यांनी केला आहे.

**हवामान अंदाज करणाऱ्या लोकांची चौकशी करा...**

पंजाब डख आणि अन्य बोगस हवामान अंदाजक यांची आर्थिक चौकशी करावी. व्यापाऱ्यांशी त्यांचे हितसंबंध आहेत का याची तपासणी करुन कारवाई करावी अशी मागणी आंदोलकांनी आपल्या मनोगतात व्यक्त केली.

VNP MOTORS
Multi Brand Car Sales & Services
सोलापूर मध्ये पहिले मल्टिब्रँड कार चे सुसज्ज शोरूम व वर्कशॉप
OFFER
पेट्रोल कार
SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹2949/-
डिझेल कार
SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹3649/-
AC OVERHAUL HATCHBACK RS. 2500/- SEDAN - 3000/- SUV - 3500/-
FREE PICK-UP & DROP
CNG RTO मान्यता प्राप्त CNG Retro Fitment Center
8000-92-8007
VNP MOTORS Pvt. Ltd.
Exclusive showroom of Second Hand Car Sales & Service
GAT No. 17/2, Hyderabad Road, Next to Ford Showroom, Solapur - 9591958007

# शेतकऱ्यांना उजनीचे सलग ८० दिवस पाणी सुरु राहणार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** उन्हाचा तडाखा वाढल्याने उजनी धरणातून शेतीसाठी पहिले उन्हाळी आवर्तन सोडण्यात आले आहे. कालवा सल्लागार समितीची बैठक होऊन आता मुख्य कालव्यातून तीन हजार क्युसेक आणि भीमा-सीना जोड कालव्यातून (बोगदा) नऊशे क्युसेकने पाणी सोडले आहे.

हे पाणी पुढे ८० दिवस सुरु राहणार आहे. धरणात सध्या ९४.६० टीएमसी पाणीसाठा आहे.उजनी धरणात सध्या ३१ टीएमसी (५७.



८० टक्के) उपयुक्त पाणीसाठा आहे.

मागच्या वर्षीच्या तुलनेत यंदा २८ टक्के पाणीसाठा अधिक आहे. शेतीसाठी सोडलेले हे पाणी शेतकऱ्यांसाठी अडीच महिने (मेअखेर) सलग सोडले जाणार आहे. पुढे जूनमध्ये पावसाळा सुरु होतो, पण यंदाच्या वर्षी कमी पावसाचा अंदाज हवामान खात्याने वर्तविला आहे. त्यामुळे पावसाचा अंदाज घेऊन पुढे उजनीतील पाणी पिण्यासाठी राखीव ठेवले जाऊ शकते.

# गारपीट अवकाळीचा पिकांना तडाखा; बळीराजा संकटात

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्यात मंगळवारी (ता. १७) विविध भागांत झालेल्या अवकाळी पाऊस आणि गारपिट झाली. यात विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. निसर्गाच्या या लहरीपणाचा शेतकऱ्यांना फटका बसला असून, हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेल्याने शेतकरी वर्ग संकटात सापडला आहे. यावर शेतकरी वर्गाकडून तात्काळ पंचनामे करून नुकसान भरपाई देण्याची मागणी होत आहे.



हिंगोली अन लातूरमध्ये फळबागांना मोठा फटका

यात हिंगोली जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह झालेल्या गारपिटीमुळे हळद, आंबा आणि कलिंगड पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. विशेषतः काढणीला आलेला आंबा जमिनीवर पडल्याने बागायतदारांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. तर लातूर जिल्ह्यातील चाकूर, औसा आणि निलंगा भागातही ७० एकरांवरील आंबा बागा उद्ध्वस्त झाल्या आहेत. मागील वर्षाचे नुकसान भरून निघण्याआधीच यंदाही अशीच परिस्थिती निर्माण झाल्याने शेतकरी अडचणीत आला आहे. (पान 2 वर..)

## संपादकीय

# धर्मांतरावर अंकुश की स्वातंत्र्यावर गदा?

बळजबरीने होणारे धर्मांतर बेकायदा ठरवणारे 'महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य अधिनियम २०१६' विधेयक राज्याच्या विधानसभेत संमत झाले. गेली अनेक वर्षे 'धर्मांतर' आणि 'सक्ती-आमिषाचे धर्मांतर' या विषयांवरून उलटसुलट चर्चा, वादंग आणि काही वेळा दंगलीही झाल्या आहेत. त्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने मांडलेल्या विधेयकामध्ये याबाबत काही मुद्द्यांच्या कायदेशीर व्याख्या करण्याचा प्रयत्न दिसून येतो; तर याच नियोजित कायद्यातील काही तरतुदी घटनेने दिलेल्या मूलभूत स्वातंत्र्यावर गदा आणणाऱ्या असल्याचे आणि राजकीय अजेंडा चालवण्याचा हा प्रयत्न असल्याचे विरोधक आणि कायदेतज्ज्ञांचे आक्षेप आहेत. काही काळापूर्वी घडलेल्या सामूहिक धर्मांतराच्या घटनांवरून वाद उभे राहिले होते.

हिंदुत्ववादी संघटना आणि भारतीय जनता पक्षातील 'धर्मरक्षक' नेत्यांकडून गेला काही काळ असा कायदा करण्याची मागणी करण्यात येत होती; तसेच महायुतीच्या जाहीरनाम्यातही 'कठोर धर्मांतरविरोधी कायदा' आणण्याचे आश्वासन देण्यात आले होते. त्यानुसार असे विधेयक विधानसभेत संमत झाले.

नागरिकाने कोणता धर्म स्वीकारावा, याचे स्वातंत्र्य घटनेने दिले आहे आणि धर्मप्रसाराचा अधिकारही दिला आहे. मात्र, बळजबरीने किंवा आमिष दाखवून धर्मांतर त्यामध्ये बसत नाही. सन १९७७मध्ये मध्य प्रदेशातील एका प्रकरणामध्ये 'बेकायदा धर्मांतर' नियंत्रित करण्याचा अधिकार राज्यांना असल्याचा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिला होता. त्या आधारावर ओडिशा, मध्य प्रदेश, छत्तीसगड, गुजरात, हिमाचल प्रदेश, उत्तर प्रदेश, कर्नाटक, हरियाणा व राजस्थान आदी १२ राज्यांमध्ये असे कायदे करण्यात आले आहेत. मात्र, यांपैकी काही कायद्यांतील काही तरतुदी संबंधित उच्च न्यायालयांनी रद्द केल्या आहेत; तसेच सर्वोच्च न्यायालयातही या कायद्यांविरोधातील याचिकांवर सुनावणी सुरू आहे.

त्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राच्या नियोजित कायद्यात प्रामुख्याने ह्यबेकायदा धर्मांतरा'ची व्याख्या करण्यात आली आहे. त्यानुसार पैसा, नोकरीचे आश्वासन, लग्नाचे वचन, भेटवस्तू किंवा मोफत शिक्षण-चांगले जीवनमान देण्याचे आश्वासन दाखवणे, एका धमार्चा गौरव वा धर्माच्या रूढींचे नुकसानकारक चित्रण आणि शिक्षणाद्वारे 'ब्रेनवॉशिंग' आदींच्या आधारे धर्मांतर बेकायदा ठरवले आहे. त्याबरोबरच धर्मांतर करणाऱ्या व्यक्तीस ६० दिवस आधी जिल्हाधिकाऱ्यांना नोटीस द्यावी लागेल; त्यानंतर याबाबतची सूचना ग्रामपंचायत किंवा संबधित प्राधिकरणाच्या कार्यालयात प्रसिद्ध करण्यात येईल आणि आक्षेप आल्यास पोलिसांकडून चौकशी करण्यात येईल, अशी तरतूद आहे. याशिवाय असे आंतरधर्मीय विवाह बेकायदा ठरल्यास रद्द होतील आणि अपत्य झाल्यास त्याचा आईच्या पूर्वीच्या धर्मात समावेश होईल, बाळाचा ताबा आईकडे राहून त्याला वडिलांच्या संपत्तीवर हक्क सांगता येईल आणि पत्नीच्या पोटगीचा अधिकारही सुरक्षित राहील, अशा तरतुदी आहेत.

'हे विधेयक कोणत्याही धर्मासाठी किंवा कोणाच्या विरोधात नाही,' असे स्पष्टीकरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले असले, तरी मुळात त्यांना असे खुलासे करावे लागतात, यावरून त्याबाबत सर्वांना विश्वासात घेण्यात आलेले नाही किंवा त्यातील तरतुदींबाबत सर्वसहमती नाही, असाच त्याचा अर्थ होतो. ह्यहे विधेयक मुस्लिम समाजाच्या आकसापोटी आणि हिंदू मतपेढी डोळ्यासमोर ठेवून केले,' असा मुस्लिम सत्यशोधक मंडळाचा आक्षेप आहे. तर साठ दिवसांची पूर्वनोटीस म्हणजे धर्मस्वातंत्र्य व गोपनीयतेच्या अधिकारावर गदा असल्याचे कायद्याच्या अभ्यासकांचे मत आहे. विशेषतः 'एका धर्माचा गौरव किंवा धर्माच्या रूढींचे नुकसानकारक चित्रण' अशा तरतुदी 'अतिव्यापक' असल्याने भविष्यात कायदेशीर धर्मांतरही महाकठीण दिसते. अशा धर्मांतरांबाबत त्रयस्थ व्यक्तींना तक्रारीचे अधिकार किंवा धर्मांतर बेकायदा नसल्याचे सिद्ध करण्याची आरोपीवरील जबाबदारी अशा तरतुदी स्वातंत्र्याला मारक आहेत.

पोलिसांनाही स्वतःहून कारवाईचे अधिकार 'पोलिस राज'ला निमंत्रण ठरू शकते. अशा कायद्यामुळे आंतरधर्मीय विवाहांची प्रक्रिया अवघड होईल. राज्य सरकारने हे विधेयक संमत करून ह्यराजकीय कार्यक्रम' पूर्ण केला; आता अन्य बारा राज्यांप्रमाणेच सर्वोच्च न्यायालयातील घटनात्मक कसोटीच्या मंथनातून पार होण्याचे आव्हान आहे. तमाम आक्षेपांचे निराकरण करून सर्व धमीर्यांमध्ये विश्वास निर्माण करण्याची आणि स्वयंघोषित धर्मरक्षकांकडून समाजातील तेढ वाढून कायदा-सुव्यवस्थेचा भंग होणार नाही, याची काळजी घेण्याची जबाबदारी अर्थातच राज्य सरकारवर आहे.

# होमुर्झः डोनाल्ड ट्रम्पला मित्र देश व नाटोचा, इराण युद्धात मदत करण्यास नकार; यामुळे ट्रम्पची गोची

दिनांक २८ फेब्रुवारीला सुरू झालेले युद्ध आज आगीचा गोळा बनला आहे आणि पश्चिम आशिया-आखातामधील संघर्षाची स्थिती दिवसेंदिवस चिघळत आहे. अमेरिकेने आपल्या ताकतीच्या बळावर व सुपर पॉवरच्या नावावर इराणला नमविन्याचा प्रयत्न केला परंतु अमेरिकेचा डाव फसला. या युध्दात इराणचे सुप्रिमो अयातुल्ला खामेनेई व बलाढ्य टॉप कमांडर सुध्दा मोठ्या प्रमाणात मारल्या गेले. परंतु इराण थोडासाही डगमगला नाही व अमेरिका-इस्त्रायलला जशास तसे उत्तर देऊन आपली रक्षा करण्यास आम्ही सक्षम आहोत ही बाब जगाला दाखवून दिली.आज जगाला अडचणीत आणण्याचे काम डोनाल्ट ट्रम यांनी केले असून जागतिक संपूर्ण अर्थव्यवस्था धोक्यात आणली आहे. डोनाल्ड ट्रम्प आपल्या वर्चस्वासाठी मित्र देश व नाटो देशांना मदत मागित आहे. या व्यतीरिक्त अमेरिकेचे कट्टर दुष्मण देश रशिया व चीन यांना सुध्दा मदत मागण्याची गरज डोनाल्ड ट्रम्पला पडली आहे. यावरून स्पष्ट होते की, डोनाल्ड ट्रम्प यांची पीछेहाट होत असुन ती लपविण्याचा प्रयत्न करीत आहे.जी संघटना अमेरिकेच्या इशाऱ्यावर चालायची त्या "नाटो"देशांनी या युद्धापासुन दुर रहाण्याचे ठरविले आहे.यावरून स्पष्ट होते की डोनाल्ड ट्रम्प कोणाचाच सहयोगी बनु शकत नाही.कारण तो जगाचा मानवी व आर्थिक हत्यारा आहे ही बाब सुरू असलेल्या युद्धावरून सिद्ध होते.डोनाल्ड ट्रम्पने आपल्या बळाचा वापर करून इराणमधील लाखों आबालवृद्ध, मुलं अशा अनेक निरअपराध्यांचा बळी घेतला यामुळे इराण तिलमिला होने सहाजिकच आहे.त्यामुळे मिडलिस्ट मधील अमेरिकेच्या संपूर्ण सैन्य तळावर हल्ले करून नेस्तनाबूत करण्याचे ठाणले आहे.यात अमेरिकेचे सैन्य मोठ्या प्रमाणात मारल्या जात आहे.परंतु या युद्धाची झळ मध्य पुर्व आशियाई देशांना भोगावी लागत आहे.कारण यात मानवीय व वित्तीय हाणी मोठ्या प्रमाणात झाली आहे आणि होत आहे. त्यामुळे इराणला नमविने तितकेसे सोपे दिसत नाही. आज या महाभयानक युध्दाचा परिणाम जगातील अनेक देशांना भोगावा लागत आहे. कारण ज्या-ज्या ठिकाणी अमेरिकन लष्करी तळ आहे अशा पश्चिम आशियात (मध्य पूर्व) अमेरिकेचे अनेक लष्करी तळ आहेत, ज्यात कतार, बहरीन, कुवेत, सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिराती (युएई), जॉर्डन, ओमान, इराक, दुबई आणि सीरिया या देशांचा समावेश होतो.या देशातील नागरिक भयभीत असुन मोठ्या प्रमाणात मानवी व वित्तीय हाणी झाल्याचे दिसून येते. इराणने अमेरिकेची अनेक क्षेत्रांत नाकाबंदी करने सुरू केले आहे व अमेरिकेला युद्ध थांबविण्यासाठी अटी ठेवल्या आहेत.यामुळे इराण अमेरिकेवर हावी होतांना दिसत आहे. आता इराण- अमेरिका- इजरायल युद्ध होर्मुझवर येवून ठेपले आहे.याकरीता इराणची नाकाबंदी करण्यासाठी आणि तेलकोंडी फोडण्यासाठी होर्मुझच्या जलमार्गाच्या आसपास मित्र देश, नाटो, फ्रान्स, जपान, दक्षिण कोरिया, ब्रिटन, रशिया, चीन यांना इराणवर दबाव टाकण्यासाठी युद्धनौका पाठविण्याची घुटने टेकवुन विनंती डोनाल्ड ट्रम्प यांनी केली आहे.परंतु सर्वांनीच डोनाल्ड ट्रम्प यांची विनंती धुडकावून लावली. त्यामुळे या युद्धात डोनाल्ड ट्रम्प एकटे पडल्याचे दिसून येते. जगातील २२ ते २५ टक्के तेल वाहू जहाज हार्मुझच्या जलमार्गाने जातात आणि दररोज २० ते २१ दशलक्ष बॅरल तेल वाहतूक येथून होत असते. होर्मुझ हे जगातील तेलाच्या वाहतुकीचे सर्वात महत्त्वाचे 'चोकपॉईट' आहे, कारण या मार्गावर जगभरातील, विशेषतः आशियाई देशांची (भारत, चीन, जपान) ऊर्जा आयात मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे. त्याचप्रमाणे तेलाव्यतिरिक्त, जागतिक स्तरावरील द्रवीकृत नैसर्गिक वायूची (एलएनजी) मोठी वाहतूक देखील या मार्गाने होते.या मार्गावरील तणावाचा थेट परिणाम जागतिक तेलाच्या किमतींवर होतो. हार्मुझवर नियंत्रण इराणचे असल्याने कोणीही इराणशी वैरत्व स्वीकारण्यास तयार नाही.इराणने तर अमेरिकेला सरळ धमकी दिली आहे की, हार्मुझच्या जलमार्गावर शत्रूची युद्ध नौका दिसली तर तीला उद्ध्वस्त केली जाईल आणि हिंमत असेल तर युद्ध नौका पाठवावी. त्यामुळे इराणचे कितीही जीवित हाणी व वित्तीय हाणी झाली असली तरी आपल्या स्वाभिमानाची लढाई लढण्यास आम्ही सक्षम आहोत ही बाब इराणने अमेरिकेला दाखवून दिली आहे. आज युध्द सुरू होऊन १६ दिवस झाले असले तरी अमेरिका-इस्त्रायलला जशास तसे उत्तर देवून इराणने आघाडी घेतली आहे. डोनाल्ड ट्रम्पच्या चुकीच्या निर्णयामुळे जगाची दैन्यावस्था झाली असून सर्वांवर तेल व आर्थिक संकट ओढावले असून पश्चिम आशियातील परिस्थिती अत्यंत चिंताजनक स्थितीत येवून पोहोचली आहे. अमेरिकेला १६ दिवसांच्या काळात हजारो बिलियन डॉलरचे नुकसान झाले आहे.परंतु झालेले नुकसान लपवित आहे.रशियन तेलाची आयात भारताने थांबवावी यासाठी भारतावर दडपण आणणारा डोनाल्ड ट्रम्प आता युद्धजन्य परिस्थिती रशियापुढे घुटने टेकले आहेत आणि डोनाल्ड ट्रम्प भारतासह जगाला सांगतो की,रशिया कडून तेल आयात करा अशा पध्दतीची विनवणी व भिक ट्रम्प मागत आहे.इराणची सुरक्षा यंत्रणा आयारजीसीने संपूर्ण कमांड आपल्या हातात घेतल्याने अमेरिका घायाळ होत असल्याचे दिसून येते. कारण युध्दाची सुरूवात अमेरिकेने आणि युद्ध त्यालाच थांबवावे लागेल.डोनाल्ड ट्रम्प हा सध्याच्या परिस्थितीत जगाचा हत्यारा आहे. डोनाल्ड ट्रम्प सत्तेत आले तेव्हा त्यांनी अमेरिकेसह जगातील अनेक देशांसाठी मोठ्या अडचणी निर्माण केल्या आहेत प्रथम टेरिफ वॉर आणि आता तिसऱ्या महायुद्धाचा भडका हा अत्यंत गंभीर व चिंताजनक विषय आहे यासाठी डोनाल्ड ट्रम्प यांनी एक पाऊल मागे हटुन अमेरिका- इराण- इस्त्रायल युद्ध थांबविले पाहिजे अन्यथा याचे गंभीर परिणाम अमेरिकेलाच भोगावे लागतील.डोनाल्ड ट्रम यांच्या चुकीच्या निर्णयामुळे अमेरिकेत त्यांची राजकीय कोंडी होतांना दिसत आहे.सैनिकांचा मृत्यू, तेल दरवाढ व बाजारातील घसरणीमुळे अमेरिकन जनतेकडुन तीव्र टीका होत आहे.कारण सध्या सुरू असलेल्या युद्धाचा सुत्रधार फक्त डोनाल्ड ट्रम्पच आहे.त्यांच्या चुकीच्या निर्णयामुळे इराणसह पश्चिम आशियातील(मिडलिस्ट) देशांची हजारोंच्या संख्येने मानवीय हाणी व मोठ्या प्रमाणात वित्तीय हाणी झाली आहे.अमेरिका खरोखरच स्वतःला सुपर पॉवर आणि लोकशाहीचा देश समजत असेल तर त्याने संवादाच्या माध्यमातून ताबडतोब युद्ध थांबवावेत.वर्चस्वाच्या लढाईत युध्द कुणीही जिंको, मरतो सर्वसामान्य माणूस, पशुपक्षी, जीवजंतू यात ना हार, ना जीत; युद्ध केवळ मृत्यू व गंभीर जखमा देतो आणि या जखमा अनेक काळापर्यंत हृदयात घर करून बसतात ही गोष्ट पिसाळलेल्या ट्रम्पला समजायला हवी.जय हिंद.



**रमेश कृष्णराव लांजेवार**
(स्वतंत्र पत्रकार)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# गारपीट अवकाळीचा पिकांना तडाखा...

**धाराशिव आणि सांगलीत द्राक्ष अन हळदीचे नुकसान**

धाराशिव जिल्ह्यात मंगळवारी (ता.१७) सायंकाळच्या सुमारास झालेल्या गारपिटीमुळे द्राक्ष बागांचे प्रचंड नुकसान झाले आहे. यात लोहारा तालुक्यात अनेक बागा जमीनदोस्त झाल्या असून, द्राक्ष खरेदीसाठी व्यापारी पुढे येत नसल्याने साठवलेला माल सडू लागला आहे.

तर, दुसरीकडे, सांगली जिल्ह्यात हळद उत्पादकांचे मोठे नुकसान झाले आहे. शेतात वाळत घातलेली हळद पावसामुळे कुजायला लागली असून, ७० ते ८० टक्के पीक वाया गेल्याचे शेतकरी सांगत आहे.

**अक्कलकोटमध्ये धान्याची नासाडी; तर गडचिरोलीत मिरची पिकावर संकट**

सोलापूरच्या अक्कलकोट तालुक्यात गारपिटीमुळे ज्वारी आणि गहू पिके आडवी झाली आहेत. ही पिके वर्षभराच्या अन्नाची सोय करणारी असल्याने ग्रामीण भागात चिंता वाढली आहे.

तसेच, गडचिरोली जिल्ह्यातही मिरची पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. सोलापूर-हैदराबाद महामार्गावर गारांचा थर साचल्याचे चित्र पाहायला मिळाले.

**कृषीमंत्र्यांकडून मदतीचे आश्वासनासह; पंचनाम्यांचे आदेश**

दरम्यान, या गंभीर परिस्थितीवर कृषीमंत्र्यांनी प्रतिक्रिया दिली असून, पुढील ४८ तास २४ जिल्ह्यांसाठी महत्त्वाचे असल्याचे सांगितले त्यांनी सांगितले आहे. तसेच, बाधित शेतकऱ्यांच्या पाठीशी सरकार खंबीरपणे उभे असून, नुकसान भरपाईसाठी तातडीने पंचनामे करण्याचे आदेश जिल्हा प्रशासनाला देण्यात आले आहेत. त्यामुळे एकही बाधित शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही, असे त्यांनी सांगितले.

# राज्यातील सर्वात मोठा महसूल घोटाळा...

"या चौकशीत 38027 प्रकरणांपैकी 2382 प्रकरणांची प्रत्यक्ष तपासणी करण्यात आली. यापैकी 247 प्रकरणात दोषी अधिकारी, त्यांच्यावर विभागीय कारवाई सुरु करणे, यामध्ये वेगवेगळे स्तर आणि शिक्षा देखील वेगवेगळ्या प्राधिकृत आहेत. अ वगार्तील अतिगंभीर अनियमितता, बेकायदेशीर असलेल्या 13 प्रकरणांत अतिगंभीर कारवाई करणे. महाराष्ट्र नागरी सेवा अंतर्गत जबर शिक्षेसाठी विभागीय चौकशी सुरु करणे. ब वगार्साठी अनियमितता- बेकायदेशीर असलेल्यांसाठी 247 अधिकारी आणि कर्मचाऱ्यांविरोधात विभागीय चौकशी करणे. किरकोळ स्वरुप तर असंख्य."

"मला एकच प्रश्न विचारायचा आहे. हे सगळं आपण आमच्या सर्वांच्या डोळ्याला पाणी लावण्यासाठी करताय का? सरकार चौकशी नेमते, मान्य करते, कोट्यवधी रुपयांचा अपहार झाल्याचे मान्य करते पण कारवाई करत नाही. मग हे सगळं कशासाठी? पाच वर्ष अधिकाऱ्यांची चौकशी करताय. आपण काय कारवाई केली? काहीच कारवाई झालेली नाही. आपण या सर्व प्रकरणात काय कारवाई करणार आणि त्याचा रिपोर्ट हे अधिवेशन संपण्याआधी देणार का?", असा प्रश्न अनिल परब यांनी केला.

**चंद्रशेखर बावनकुळे यांचं उत्तर काय?**

"मी या खात्याचा मंत्री झाला तेव्हा माझ्याकडे अनेक तक्रारी आल्या. कलम 155 चा दुरुपयोग कोट्यवधी रुपयांच्या शासनाच्या महसूलाचे नुकसान करणारी कृती करण्यात आली. दुसरा गुन्हा म्हणजे जे अधिकार मंत्र्यांना आहेत ते परस्पर वर्ग 2 चे वर्ग 1 केले. काही ठिकाणी मालकी हक्कात बदल केला. हे अतिगंभीर आहे. जमिनीच्या क्षेत्रात वाढ करणे, घट करणे सारखे प्रकार घडले आहेत. इतर हक्काच्या लोकांची नावे काही ठिकाणी कमी केले. या तक्रारी माझ्याकडे आल्या. पुणे जिल्ह्यात 38 हजार 27 प्रकरण आहेत. आम्ही महाराष्ट्रातील इतर विभागांचे देखील तपासणार आहोत."

"महसूल खात्यात आतापर्यंतच्या प्रवासात सर्वात मोठी अनियमितता किंवा सर्वात गंभीर हे प्रकरण आहे. ज्यांनी या प्रकरणात दुरुपयोग करुन कितीतरी लोकांच्या आत्महत्या होतील, असं कृत्य केलं. मोठ्या माणसाने गरिबाला फसवलं. त्यांची जमिनी कमी करुन दिली. हे सरकारच्या लक्षात आलं आहे. या प्रकरणी रिपोर्ट आला आहे. अतिगंभीर प्रकरणात 15 अधिकारी आहेत. ब - गंभीर वर्गात 82 अधिकारी आहेत. क मध्ये 55 अधिकारी आहेत. आता हे महसूल खाते पूर्ण खाली होऊन जाईल."

"हा रिपोर्ट आमच्याकडे जानेवारी महिन्यात आला आहे. फौजदारी गुन्हे दाखल करायचे आहेत. यासोबत असं राज्यात किती झालं आहे, किती लोकांचा यामध्ये जीव अटकला आहे, आपल्याला सगळं रिविव्ह्यू करावे लागणार आहेत. जिल्हाधिकाऱ्यांना रिविव्ह्यू करण्याचे अधिकार दिले आहेत. अन्यथा हे एक-दीड लाख लोकांचे जीव घेणारे आहे. मी पुढच्या सात दिवसांत पुणे जिल्ह्यातील प्रकरणाची सविस्तर माहिती देईन. त्यानंतर राज्यभराची माहिती मिळवून पुढच्या अधिकारात माहिती देईन. राज्यातील दीड-दोन लाख कुटुंबाचा हा विषय आहे. माझी मुख्यमंत्र्यांसोबत चर्चा झाली आहे. त्यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेतली आहे."

यावेळी अनिल परब यांनी संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित करा, अशी मागणी केली. त्यावर महसूल मंत्र्यांनी अधिवेशन संपेपर्यंत सर्व संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल आणि पुढच्या कारवाईची काय रुपरेषा असेल ते स्पष्ट केली जाईल, अशी ग्वाही सभागृहात दिली.

**बावनकुळेंची विधान परिषदेत कबुली**

या प्रकरणावर विधान परिषदेत वादळी चर्चा झाली. यावेळी मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रशासकीय स्तरावर झालेल्या या मोठ्या चुकीची कबुली दिली. "शुद्धलेखनात बदल करण्याच्या नावाखाली सातबारा बदलले गेले, ही बाब गंभीर आहे. महसूल खात्याच्या इतिहासातील हा आतापर्यंतचा सर्वात मोठा घोटाळा असू शकतो," असे विधान त्यांनी सभागृहात केले. सुमारे १ ते १.५ लाख शेतकरी या प्रक्रियेत भरडले गेल्याचेही त्यांनी मान्य केले.

# महानगरपालिकांनाही प्लास्टिक फुलांच्या बाजारावर कारवाईचे अधिकार - मुख्यमंत्री

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** राज्यात प्लास्टिक बंदी अस्तित्वात असली तरी बाजारपेठेत कृत्रिम (प्लास्टिक) फुलांचा वाढता वापर शेतकऱ्यांच्या नैसर्गिक फुलांच्या व्यवसायावर परिणाम करत आहे. प्लास्टिक फुलांच्या बंदीसाठी विशेष सूचना काढण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले.

यााबाबत सदस्य प्रविण दरेकर यांनी प्रश्न उपस्थित केला. तर सदस्य शशिकांत शिंदे, अमित गोरखे, अमोल मिटकरी, सदाभाऊ खोत, अनिल परब यांनी उपप्रश्न उपस्थित केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, प्लास्टिक बंदीच्या विद्यमान अधिसूचनेअंतर्गतच विशेष अधिसूचना काढून



प्लास्टिक व कृत्रिम फुलांच्या वापरावर बंदी घालण्यात येईल. महानगरपालिकांना अशा प्रकारच्या बाजारपेठांवर कारवाई करण्याचे अधिकार दिले जाणार असून, प्लास्टिक फुलांचा वापर करणाऱ्या डेकोरेशन व्यावसायिक, बँक्वेट हॉल्स आणि इतर संबंधित घटकांनाही नोटिस दिली जाईल. नियमांचे उल्लंघन झाल्यास संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

याबाबत अधिक माहिती देताना मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या, महाराष्ट्र प्लास्टिक व थमाकील बंदी अधिसूचना २०१८ नुसार सजावटीसाठी वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिक आणि थमाकीलवर पूर्णतः बंदी आहे. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने २९ ऑगस्ट २०२५ रोजी सण-उत्सव काळात कृत्रिम फुलांचा वापर टाळण्याबाबत परिपत्रक जारी केले आहे. एप्रिल २०२५ ते जानेवारी २०२६ या कालावधीत १,२४,७८३ आस्थापनांची तपासणी करण्यात आली यापैकी ३,३९० आस्थापनांवर कारवाई करण्यात येऊन १.५५ कोटी दंड वसूल करण्यात आला असून ६७.५४ मेट्रिक टन एकल वापर प्लास्टिक जप्त करण्यात आले आहे.

# गॅस एजन्सीनी 23 मार्च पासून 96 तासात घरपोच गॅस सिलेंडर उपलब्ध करून द्यावेत - जिल्हाधिकारी आशीर्वाद

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** मुस्लिम धर्मियांचा रमजान ईद हा सण 21 मार्च 2026 रोजी साजरा होत आहे. त्यानंतर 23 मार्च 2026 पासून जिल्ह्यातील सर्व गॅस एजन्सीनी गॅस वितरणात एकसूत्रता राखण्याकरता गोदाम, गॅस एजन्सी व इतर ठिकाणाहून गॅस सिलेंडरचे वितरण करू नये. जिल्ह्यात सर्वत्र घरगुती वापराच्या गॅस सिलेंडरचा पुरवठा ऑनलाईन बुकिंग झाल्यानंतर ओटीपी द्वारे 96 तासात घरपोच करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले.

सोलापूर जिल्ह्यातील गॅस वितरणा संदभार्तील कार्यवाहीच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेच्या सभागृहात आयोजित आढावा बैठकीत जिल्हाधिकारी आशीर्वाद मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे, अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे, एलपीजी गॅस पुरवठा करणारे जिल्हा समन्वयक अधिकारी भुकय्या रघुकुमार यांच्या सह सोलापूर शहर व जिल्ह्यातील गॅस एजन्सी चे प्रतिनिधी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद पुढे म्हणाले की, घरगुती वापराच्या गॅस सिलेंडर बाबत 23 मार्च 2026 पासून जिल्ह्यातील एकाही गॅस एजन्सी कडून रांगेत उभा राहून ग्राहकांना गॅस सिलेंडर देऊ नये. ऑनलाइन बुकिंग केल्यानंतर ओटीपी द्वारे 96 तासात संबंधित एजन्सीने ग्राहकांना घरपोच गॅस सिलेंडर उपलब्ध करून द्यावेत. आपल्या गॅस एजन्सी व गोदाम समोर ऑनलाइन बुकिंग, घरपोच सेवेद्वारे गॅस मिळेल एजन्सी मध्ये गॅस मिळणार नसल्याबाबतचे बोर्ड दर्शनी भागात लावावेत. तसेच त्याबाबतचे एसएमएस आपापल्या ग्राहकांना मोबाईलवर पाठवावेत, असेही निर्देश त्यांनी दिले.



जिल्ह्यात एलपीजी चा पुरवठा मागणीप्रमाणे होत आहे. तरी संबंधित कंपन्यांनी त्याबाबतचा दैनंदिन अहवाल प्रशासनाला सादर करावा. कंपनीच्या स्तरावर गॅस विक्रेत्या साठी ज्या सूचना असतील त्या लेखी स्वरूपात गॅस विक्रेत्यांना द्याव्यात. दुसरे गॅस सिलेंडर वाटप शहरी भागात 25 दिवस तर ग्रामीण भागात 45 दिवस आहे त्या नियमावलीचे काटेकोरपणे पालन करावे. गॅस एजन्सीने कोणताही अवैध व्यापार होणार नाही याकरिता आपल्या कर्मचाऱ्यांवर नियंत्रण ठेवावे. जर कुठेही असे होत असेल तर त्याबाबतची माहिती तत्काळ प्रशासनाला द्यावी. संवेदनशील गॅस एजन्सी ची माहिती पुरवठा विभागाला द्यावी. त्याप्रमाणे त्या एजन्सीला पोलीस संरक्षण देण्याबाबत पोलीस विभागाला कळविण्यात येईल. तसेच पोलीस विभागाने रमजान ईद च्या पार्श्वभूमीवर गॅस एजन्सी समोर खरेदी होऊ नये याकरिता शहरी व ग्रामीण भागात पेट्रोलिंग करावे असेही जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सांगितले.

एलपीजी गॅस पुरवठा करणाऱ्या कंपन्याचे जिल्हा समन्वयक अधिकारी श्री. रघुकुमार यांनी गॅस पुरवठ्याच्या अनुषंगाने एचपीसीएल, बीपीसीएल व आयओसीएल यांच्याकडून एजन्सीसाठी आलेल्या सूचना दिलेल्या आहेत. जिल्ह्यात मागणीप्रमाणे एलपीजी गॅस पुरवठा मिळत असल्याचे सांगून 23 मार्च 2026 पासून ऑनलाईन बुकिंग केल्यानंतर ओटीपी द्वारे 96 तासात गॅस सिलेंडर एजन्सी उपलब्ध करून देतील, असे त्यांनी सांगितले.

प्रारंभी जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी ग्रामीण भागातील गॅस पुरवठ्याच्या अनुषंगाने माहिती दिली तर अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे यांनी सोलापूर शहरात एलपीजी गॅस पुरवठ्याच्या अनुषंगाने माहिती दिली.

## वात्रटिका

**चल आता एक होऊ**

बाण म्हणाला मशालीला
कशाला उगाच जळते...
आपले नाते नि गोत्र एकच
न सांगता लोकांना कळते...
आजूबाजूला बघ जरा आणि
झाले गेले विसरून जाऊ...
जुळवून घेतात सगळेच,तसे
आपणही आता एक होवू...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

पान १ वरून

# रुपाली चाकणकर आता तरी...

कॅप्टन खरातांच्या वैयक्तिक आयुष्य किंवा त्यांच्यावर झालेल्या आरोपांबाबत मला कल्पना नाही. आता जे आरोप होत आहेत त्याबाबत पोलिस निष्पक्षपणे चौकशी करतील. पोलीस तपासावर आपला पूर्ण विश्वास आहे असं रुपाली चाकणकरांनी म्हटलं.

**गुंगीचे औषध देऊन अत्याचार**

नाशिकमधील बहुचर्चित अशोक खरात उर्फ कॅप्टन या भोंदूगिरी करणाऱ्या मांत्रिकाला पोलिसांनी अटक केली आहे. या भोंदूबाबाला आज नाशिक जिल्हा न्यायालयात हजर करण्यात आलं. या मांत्रिकाने गुंगीचे औषध देऊन एका महिलेवर बलात्कार केल्याप्रकरणी नाशिकच्या सरकारवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

महत्त्वाची बाब म्हणजे या भोंदूबाबाकडे अनेक राजकीय नेते, अधिकारी, सेलिब्रिटी आपले भविष्य जाणून घेण्यासाठी जात होते. त्यांचे व्हीडिओही पोलीस तपासात उघडकीस आले आहेत. सिन्नर तालुक्यात अशोक खरातने श्री शिवनिका संस्थान या मंदिराची स्थापना केलीं आहे. या मंदिराच्या विश्वस्त पदावर महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर आहेत. तर एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना त्यांनीही या मंदिरात जाऊन दर्शन घेतले होते. तेव्हापासून अशोक खरात जास्त चर्चेत आला होता.

# भूगोलाचा अभ्यास झाला नसल्यानं पठ्ठ्यानं थेट पेपरचीच केली...

त्याने भूगोलाच्या प्रश्नपत्रिका असलेले दोन गठ्ठे आणि तीन कोऱ्या उत्तर पत्रिका आपल्या सोबत घेऊन तेथून तो पुन्हा घरी आला. यातील एक गठ्ठा फोडून त्याने ती प्रश्नपत्रिका पाहिली होती.

**50 प्रश्नपत्रिका 3 कोऱ्या उत्तर पत्रिका इलेक्ट्रिक कटर आणि इलेक्ट्रिक बाइक ताब्यात**

आज पोलिसांनी या विधी संघर्ष ग्रस्त अल्पवयीन बालकाकडून चोरीला गेलेल्या 50 प्रश्नपत्रिका 3 कोऱ्या उत्तर पत्रिका इलेक्ट्रिक कटर आणि इलेक्ट्रिक बाइक ताब्यात घेतली आहे. या प्रश्नपत्रिका चोरीनंतर राज्यात मोठी खळबळ उडाली होती. काल या प्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर आजचा पेपर होणार का हा प्रश्न असताना रात्री उशिरा आज पेपर वेळापत्रकाप्रमाणे घेण्याचा निर्णय बोडार्ने घेतला होता. आज त्यानुसार राज्यात सर्व ठिकाणी दहावीचा शेवटचा हा भूगोलाचा पेपर घेण्यात आला. पेपर चोरणाऱ्या या मुलाने या प्रश्नपत्रिकेचा गैरवापर केला नसल्याची खात्रीही पोलिसांनी चौकशी करून घेतली असल्याचे समजते. आता उद्या नियमानुसार या विधीग्रस्त संघर्ष बालकास बाल न्यायालयासमोर उभे केले जाणार आहे.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# चिंचोलीकाटी एमआयडीसीतील दूषित पाण्याचा मुद्दा विधानसभेत; कंपन्यांवर कारवाईची मागणी

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त) :** मोहोळ विधानसभा मतदारसंघातील चिंचोलीकाटी एमआयडीसी परिसरातील सहा कंपन्यांकडून सोडल्या जाणाऱ्या दूषित पाण्यामुळे शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याचा गंभीर मुद्दा आमदार राजू खरे यांनी विधानसभेत लक्षवेधीद्वारे उपस्थित केला. संबंधित कंपन्यांवर तात्काळ कारवाई करण्याची मागणी त्यांनी यावेळी केली.

चिंचोलीकाटी येथील एमआयडीसीमधील काही कंपन्यांकडून केमिकलयुक्त दूषित पाणी सोडले जात असून त्यामुळे परिसरातील शेती बाधित होत आहे. याशिवाय विहिरी व



बोअरवेलमधील पाणीही दूषित होत असल्याने ग्रामस्थांच्या आरोग्यावर धोका निर्माण झाला आहे. या प्रकरणी ग्रामस्थ आणि लोकप्रतिनिधींनी वारंवार पर्यावरण विभागाकडे तक्रारी करूनही कोणतीही ठोस कारवाई न झाल्याबद्दल आ. खरे यांनी नाराजी व्यक्त केली.

या दूषित पाण्यामुळे सुमारे १५८ हेक्टर शेतीचे नुकसान झाल्याची माहिती त्यांनी सभागृहात दिली. तसेच, चिंचोलीकाटी एमआयडीसीतील काही केमिकल कंपन्यांवर काही महिन्यांपूर्वी धाड टाकून ठाणे पोलिसांनी मोठ्या प्रमाणात अमली पदार्थांचा साठा जप्त केल्याचाही उल्लेख त्यांनी आपल्या भाषणात केला.

या मुद्द्यावर पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे यांनी हा विषय अत्यंत गंभीर असल्याचे मान्य करत, गृहमंत्री तथा मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून संबंधित कंपन्यांवर कठोर कारवाई करण्याची विनंती करण्यात येईल, असे आश्वासन दिले.

# पुरुष यांचा सुधारक सन्मान पुरस्कार कार्यक्रम संपन्न

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) सोलापूर व नवतेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्प या अंतर्गत सावित्रीबाई फुले लोकसंचालित साधन केंद्र यशवंतनगर अंतर्गत Gender Sensitive Role Model Award सन्मान सुधारक पुरस्कार कार्यक्रम घेण्यात आला. सदर पुरस्कार हा महिला सक्षमीकरणासाठी संवेदनशीलता दाखविणारे व गावपातळीवर महिलांच्या विकासासाठी पुढाकार घेणाऱ्या व महिला सक्षमीकरणासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पुरुष यांचा सुधारक सन्मान पुरस्कार कार्यक्रम ट्रॉफी,शाल व गुलाब पुष्प




देऊन सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमाचा मुख्य हेतू म्हणजे गावस्तरावर Men Gender Sensitive Role Model घडविणे,महिलांसाठी सक्षम व पुरक वातावरण निर्माण करणे आणि महिला सक्षमीकरणाच्या प्रक्रियेला गती देणे हा आहे. सदर कार्यक्रमासाठी बँक ऑफ महाराष्ट्र विभागीय कार्यालय सोलापूरचे बिझनेस डेव्हलपमेंट ऑफिसर संतोष बोरमवाड,बँक ऑफ महाराष्ट्र शाखा अकलूजचे शाखा व्यवस्थापक महेश गव्हाणे, बँक ऑफ इंडिया अकलूज शाखेचे प्रज्वल देशमुख तसेच माळीनगर येथील डॉ. सौ. विनया हाके प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सुरवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन प्रमुख पाहुण्यांच्या शुभहस्ते करून दीपप्रज्वलन करण्यात आले.या कार्यक्रमाचे प्रस्ताविक सावित्रीबाई फुले लोकसंचालित साधन केंद्राच्या व्यवस्थापक तनुजा पाटील यांनी केले तर सूत्रसंचालन अश्विनी गिरमे यांनी केले. कार्यक्रमा वेळी डॉ. विनया हाके यांनी मार्गदर्शन केले, त्याचबरोबर माविम मित्र मंडळातील राजेश कांबळे,दशरथ नवगिरे, विशाल जगदाळे यांनी मनोगत व्यक्त केले.त्याचबरोबर सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये कपल गेम घेण्यात आला. २१ ग्रामसंघांमधून एका पुरुषांचा सन्मान उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी सीएमआरसीच्या अध्यक्षा सौ. जयश्री एकतपुरे,सचिव राजश्री जाधव, कोषाध्यक्षा कौसर शेख व सर्व कार्यकारी मंडळ उपजीविका सल्लागार आकाश लोंढे,क्षेत्र समन्वयक रिजवाना शेख, वैशाली कांबळे, मनीषा गवळी हे उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व सीआरपी यांनी परिश्रम घेतले.

# श्री स्वामी समर्थ प्रकट दिनानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन

**माळीनगर (कटूसत्य वृत्त):-** माळशिरस तालुक्याच्या पूर्व भागातील अकलूज-टेंभुर्णी रोडवरील तांबवे-पायरीचा पूल(दत्तवाडी) येथे श्री एकमुखी दत्त प्रभूंच्या मंदिरात श्री स्वामी समर्थ प्रकट दिनूानिमित्ताने शुक्रवार दि.२० मार्च रोजी एक दिवसीय श्री विष्णु याग व श्री स्वामी याग अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन केले असल्याची माहिती श्री दत्त मंदिर समितीचे सदस्य बापू तात्या मुंडपणे यांनी दिली.

श्री स्वामी समर्थ प्रकट दिनानिमित्त दि.२० मार्चला सकाळी ८ ते दुपारी २ वाजेपर्यंत श्री विष्णु याग व श्री स्वामी याग यामध्ये प्रायश्चित, प्रसादसंकल्पन, पंचांगकर्म, मंडलदेवता तास्थापन, अभिषेक, अग्निमंथन, नवग्रह हवन, महाआरती असे कार्यक्रम होणार आहेत. तसेच दु. ३ ते ५ या काळात वास्तुशास्त्र व ज्योतिषशास्त्र या विषयावर प्रश्न-उत्तरे कार्यक्रम घेण्यात येणार आहे.



त्याचप्रमाणे सायं. ५ ते ७ यावेळेत वारकरी भूषण ह.भ.प. गणेशानंद महाराज धुमाळ, देशमुखवाडी यांचे हरिकीर्तन होणार आहे. तसेच सायं.७ वाजता फुलांचा कार्यक्रम आणि सायं.७ ते ९ वाजेपर्यंत सर्व भक्तांना महाप्रसादाची सोय करण्यात आलेली आहे.

या श्री स्वामी समर्थ प्रकट दिना कार्यक्रमा दिवशीचे अन्नदाते माजी पं.स.सदस्य अनिल जाधव (महाळुंग) व मोहोळ चे संतोष वायचळ हे आहेत. श्री स्वामी समर्थ प्रकट दिनाचा कार्यक्रम नाशिक येथील यज्ञाचार्य मयूर परेश कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात येणार असून श्री स्वामी समर्थ व श्री दत्त भक्तांनी या कार्यक्रमासाठी शुक्रवारी उपस्थित राहावे असे आवाहन मनोकामना पूर्ती श्री एकमुखी दत्त मंदिर व श्री स्वामी समर्थ मंदिर समितीचे सदस्य आबासाहेब साळुंखे यांनी केले आहे.

# कोंडी येथील 'कॅसिनो' ऑर्केस्ट्रा बारवर सोलापूर तालुका पोलिसांचा छापा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** उत्तर सोलापूर तालुक्यातील मौजे कोंडी येथील 'कॅसिनो' ऑर्केस्ट्रा बारवर सोलापूर ग्रामीण पोलिसांनी मंगळवारी (१७ मार्च) रात्री मोठी कारवाई केली. या छाप्यात पोलिसांनी ५ लाख १२ हजार ४२० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, बार मालक, मॅनेजर, ग्राहक अशा 11 जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**नेमकी घटना काय ?**

मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, कोंडी येथील कॅसिनो ऑर्केस्ट्रा बारमध्ये महिला अश्लील हावभाव करून आणि तोकडे कपडे घालून डीजेच्या तालावर नृत्य करत असल्याचे समजले होते. या माहितीची खातरजमा केल्यानंतर उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत देवळेकर यांच्या पथकाने आणि सोलापूर तालुका पोलिसांनी या ठिकाणी अचानक छापा टाकला.

**छाप्यादरम्यानची स्थिती**

पोलिसांनी छापा टाकला असता, त्या ठिकाणी महिला अश्लील नृत्य करताना आढळून आल्या. तसेच तेथे बसलेले ९ ग्राहकही नर्तिकांकडे पाहून अश्लील हावभाव करत संगीताच्या तालावर नाचत असल्याचे दिसून आले.

**11 जणांवर कारवाई**

या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल भीमराव उत्तम खंडागळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सोलापूर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. 11 महिला कलाकार, ग्राहक, बारचा मॅनेजर आणि मालक अशा एकूण 11 आरोपींचा समावेश आहे.

**५ लाखांचा मुद्देमाल जप्त**

कारवाईदरम्यान पोलिसांनी घटनास्थळावरून साऊंड बॉक्स, रोख रक्कम, मोटारसायकल आणि मोबाईल हॅन्डसेट असा एकूण ५ लाख १२ हजार ४२० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

**यांनी केली कारवाई**

ही कारवाई सोलापूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत देवळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या पथकात सोलापूर तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राहुल देशपांडे व त्यांच्या पथकातील अधिकारी आणि अंमलदारांचा समावेश होता.



## जाहिर प्रसिध्दीकरण

क्र.अभि/कावि नं.४००/२०२५

**मोहोळ येथील मे. तहसिलदार सो, यांचे समोर**

श्री. जगन्नाथ रामलिंग हजारे,वय- ६५ वर्षे, धंदा- शेती, रा. मलिकपेठ, ता. मोहोळ जि. सोलापूर } अर्जदार

विरूध्द

ग्रामपंचायत मलिकपेठ,ता.मोहोळ, (अर्जाची नोटीस ग्रामसेवक ग्रामपंचायतमलिकपेठ, यांचेवर बजावविण्यात यावी.) } सामनेवाला

ज्याअर्थी वर नमुद अर्जदाराचा मुलगा म्हणजेच विशाल जगन्नाथ हजारे याचा मृत्यु ता. २६/०८/२०२४ रोजी मौजे मलिकपेठ, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांचेकडे अर्जदाराचा मुलगा म्हणजेच विशाल जगन्नाथ हजारे यांची मृत्यु दाखल्याची ता. २६/०८/२०२४ रोजीप्रमाणे मागणी वरील नमुद तारखेनुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे ऑगस्ट २०२४ चे अभिलेखात अर्जदाराचा मुलगा म्हणजेच विशाल जगन्नाथ हजारे यांच्या मृत्युची नोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबद्दल सदर अर्जदाराने या मे. कोर्टात सामनेवाला यांचेकडील अभिलेखात मृत्युची नोंद घेणेबाबत आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि. १०/४/२०२६ रोजी किंवा ही नोटीस प्रसिध्द केल्यापासुन ३० दिवसाचे आत समक्ष अथवा वकीलामार्फत मे. कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणीप्रमाणे मृत्यु दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्यानिशी दिले असे. ता. १८/३/२०२६ सही/-

लिपीक (शिक्का) तहसिलदार,मोहोळ.


# धाराशिव-तुळजापूर-सोलापूर रेल्वे मार्गासाठी 1000 कोटी रुपये तातडीने द्यावे - खा. ओमराजे निंबाळकर

**नवी दिल्ली (वृत्त सेवा):-** संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात रेल्वे मंत्रालयाच्या अनुदान मागण्यांवरील चर्चेदरम्यान धाराशिव लोकसभा मतदारसंघाचे खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी मराठवाड्यातील प्रलंबित रेल्वे प्रश्नांवर ठाम आणि आक्रमक भूमिका मांडत केंद्र सरकारचे लक्ष वेधले.

मराठवाड्याच्या विकासासाठी सक्षम रेल्वे सुविधा अत्यावश्यक असल्याचे अधोरेखित करत त्यांनी खालील महत्त्वाच्या मागण्या केल्या:

१. धाराशिव-तुळजापूर-सोलापूर रेल्वे मार्गासाठी 1000 कोटी रुपयाची तात्काळ तरतुद करावी

तुळजापूरला रेल्वेने जोडण्याचे दिलेले आश्वासन अद्याप पूर्ण झालेले नाही. धाराशिव ते




तुळजापूर या मार्गाचे काम सुरू असले तरी तुळजापूर ते सोलापूर हा टप्पा अजूनही निविदा प्रक्रियेत अडकलेला आहे. या संपूर्ण मार्गासाठी सुमारे २ हजार कोटी रुपयांची आवश्यकता असून केंद्राने आपला १ हजार कोटी रुपयांचा हिस्सा तातडीने मंजूर करावा, अशी मागणी करण्यात आली. यामुळे आई तुळजाभवानीचे पवित्र तीर्थक्षेत्र रेल्वे नकाशावर येईल.

२. लातूर-पुणे इंटरसिटी गाडी तातडीने सुरू करा

लातूर, धाराशिव आणि बार्शी परिसरातील हजारो विद्यार्थी व नोकरदार दररोज पुण्याकडे प्रवास करतात. सध्याच्या गाड्यांची अपुरी संख्या लक्षात घेता लातूर ते पुणे इंटरसिटी गाडी तातडीने सुरू करावी, अशी आग्रही मागणी करण्यात आली.

३. हरंगूळ-पुणे गाडी पुणे मुख्य स्थानकापर्यंत चालवा

सध्या हरंगूळ ते पुणे गाडी हडपसरपर्यंतच धावते, त्यामुळे प्रवाशांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागते. ही गाडी पूर्वीप्रमाणे पुणे मुख्य स्थानकापर्यंत चालवावी, अशी मागणी करण्यात आली.

४. रेल्वे थांबे व नवीन मार्गांचे सर्वेक्षण :

कळंब रोड स्थानकावर लातूर-मुंबई गाडीला थांबा देण्यात यावा

ढोकी स्थानकावर नांदेड-पनवेल गाडीला थांबा द्यावा

धाराशिव ते छत्रपती संभाजीनगर या नवीन मार्गाच्या सर्वेक्षणासाठी मंजूर निधीबद्दल समाधान व्यक्त करत हे सर्वेक्षण तातडीने पूर्ण करावे, अशी मागणी करण्यात आली

५. पुणे-सिकंदराबाद जलद गती मार्ग धाराशिव-लातूरमार्गे न्यावा

पुणे ते सिकंदराबाद या प्रस्तावित जलद गती मार्गाचा समावेश धाराशिव व लातूरमार्गे करण्यात यावा, जेणेकरून मराठवाड्याच्या विकासाला मोठी चालना मिळेल, अशी ठाम भूमिका मांडण्यात आली

६. धाराशिवझछत्रपती संभाजीनगर रेल्वे मार्गाबाबत विशेष मागणी

छत्रपती संभाजीनगर हे मराठवाड्याचे प्रमुख विभागीय व न्यायिक केंद्र असून येथे उच्च न्यायालयाचे खंडपीठ, अजिंठा-वेरूळसारखी जागतिक वारसा स्थळे तसेच Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University असल्यामुळे मराठवाड्यातील नागरिक, विद्यार्थी व विविध क्षेत्रातील लोकांची येथे सतत ये-जा सुरू असते

धाराशिव ते छत्रपती संभाजीनगर हा थेट रेल्वे मार्ग निर्माण करणे अत्यंत आवश्यक असून यामुळे मराठवाड्यातील दळणवळण व्यवस्था अधिक सक्षम होईल, असे खासदारांनी ठामपणे मांडले. या रेल्वे मार्गाच्या सर्वेक्षणासाठी केंद्र सरकारकडून ६ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आल्याबद्दल समाधान व्यक्त करत रेल्वे मंत्रालयाचे आभार मानण्यात आले. मात्र हे सर्वेक्षण लवकरात लवकर पूर्ण करून प्रत्यक्ष कामाला गती द्यावी, अशी ठाम मागणी करण्यात आली. या मार्गामुळे धाराशिव व परिसरातील नागरिकांना छत्रपती संभाजीनगर येथे प्रवास करणे अधिक जलद, सुरक्षित व सोयीस्कर होणार असून विद्यार्थी, व्यापारी व सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे



## नावात बदल

माझे जुने नाव : **अभिजीत संजीव आडके** असे होते ते बदलून मी माझे नवीन नाव : **अभिजीत संजीव आडके** (पत्ता : १/ १, उत्तर सदर बाजार, बेडर पूल, सोलापूर - ४१३००३) असे केले आहे. तरी मला आज पासून माझ्या नवीन नावाने ओळखावे.

## नावात बदल

माझे जुने नाव : **संजीव शंकरराव आडके** असे होते ते बदलून मी माझे नवीन नाव : **संजीव शंकरराव आडके** (पत्ता : १/ १ , उत्तर सदर बाजार, बेडर पूल, सोलापूर - ४१३००३) असे केले आहे. तरी मला आज पासून माझ्या नवीन नावाने ओळखावे

## नावात बदल

माझे जुने नाव : **सौ. जयंती संजीव आडके** असे होते ते बदलून मी माझे नवीन नाव : **सौ. जयंती संजीव आडके** ( पत्ताः १/ १, उत्तर सदर बाजार, बेडर पूल, सोलापूर - ४१३००३) असे केले आहे. तरी मला आज पासून माझ्या नवीन नावाने ओळखावे.

## नावात बदल

माझे जुने नाव : **बसम्मा छत्रप्पा बिराजदार** असे होते ते बदलून मी माझे नवीन नावः **भाग्यश्री निंगप्पा मुळे** (पत्ता : मु पो मुस्ती, ता दक्षिण सोलापूर, जी सोलापूर - ४१३००२) असे केले आहे. तरी मला आज पासून माझ्या नवीन नावाने ओळखावे.

## नावात बदल

'पासपोर्ट काढण्यासाठी मी माझे नांव **हुसेना बी चिस्ती हुसेन** वरुन **हुसेनाबी चिस्तीहुसैन अत्तारवाले** असे बदलत आहे'. (जेथे हुसेना बी चिस्ती हुसेन हे जुने नाव आहे आणि हुसेनाबी चिस्तीहुसैन अत्तारवाले हे नवीन नाव आहे).

## CHANGE IN NAME

I here by declare that my old name **Khairdi Jaweed Ahmed Md Hanif** has been changed to new name **Javed Ahmed Mohamad Hanif Khairdi** (Address - 10/3 Vidya Nagar, North Sadar Bazar Solapur - 413003) Kindly note the same.

## Classified - छोटी जाहीरात

### निर्मल व्यसनमुक्ती केंद्र

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-

**8083608083**
**9922646566**
**8698732109**

### बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)

### अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी

**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**


**9822964815**
**9421984815**

झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

### पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

### वर-वधू



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंद्र


**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**

मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर

**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779

**वाचकांसाठी निवेदनः** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.


## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) एकवीस दुणे २) लिंबू पाण्याचे पेय ३) कजरा उलट लिहा ४) तय उलट लिहा ५) कोकणातील एक स्ट्राँग नेते ६) परंतु (हिंदीत) ७) पत्र (इंग्रजीत) १०) ग्रॅज्युएट (मराठीत) १२) थंड, शीत १५) ॲडव्होकेट (मराठीत) १६) राजाबाबू चित्रपटातील गोविंदाचा पालक असलेला अभिनेता १७) बारा वर्षांचा काळ १९) एक फळ २०) देखणा, रूबाबदार व्यक्तिमत्त्व २१) फेब्रुवारी (हिंदीत) २३) सहा उलट लिहा २५) झी टीव्हीवरील विनोदी मालिका-चला ** येऊ द्या २६) कॉलनी (मराठीत) २७) वडिलोपार्जित असलेला संपत्तीचा हक्क ३०) याचे कणीस भाजून खातात ३१) उत्सवाचा दिवस ३३) वस्तूची विक्री ३४) हिंदी सिनेसृष्टीतील एक अभिनेता, दीपिकाचा पती-**** सिंह ३५) दैत्य, दानव ३६) राखण, एकनाथ खडसेंच्या सून-** खडसे ३८) रोख ४१) वाट, मार्ग (हिंदीत) ४३) उदार मनाने देणे, ** करणे

**आडवे शब्द :**
१) बिहारमधील एक प्रख्यात जिल्हा व लोकसभा मतदारसंघ
५) महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष
८) चांदी ९) बस अथवा ट्रकच्या केबिनचे छत
११) बगळा १२) गाणे गाणारा १३) दात, दंत
१४) नवऱ्याची दुसरी बायको १६) सबब, निमित्त
१८) शरीर (हिंदीत) १९) गुन्हा २१) सब्र का ** मिठा होता है
२२) एक भारतीय फलंदाज-अजिंक्य *** २४) तरचा साथीदार
२५) निश्चित, खात्रीशीर २६) श्रीरामाने चौदा वर्षे भोगला तो
२८) जंगल अथवा डोंगराला लागलेली आग २९) माहेरच्या विरूध्दार्थी शब्द
३१) सल्ला (हिंदीत) ३२) शुगर (मराठीत)
३५) पॉलिटिक्स (मराठीत) ३७) शरीर, काया ३९) परंतु, शर्थ
४०) चित्त, ध्यान, लाख
४२) हनुमानाच्या हातातील शस्त्र
४४) दहा गुणिले सात
४५) पुणे लगतचा एक जिल्हा

## सुडोकु - 202

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | | | 1 | 3 | | | 8 | |
| | | | | | | | | 7 |
| 8 | | | 7 | 6 | 4 | 9 | 1 | 2 |
| 6 | | | | | 9 | 1 | | 8 |
| 5 | | 3 | 8 | 7 | | 6 | | 9 |
| | | | | 5 | | | 7 | 4 |
| | 1 | 9 | 4 | | | | | 5 |
| | | | 9 | | | 2 | 4 | 3 |
| | | 2 | 6 | 8 | 3 | 7 | | |

# दावत-ए-इफ्तारमधून सामाजिक सलोख्याचा संदेश - आ. कल्याणशेट्टी



**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):** पवित्र रमजान महिन्यानिमित्त आयोजित 'दावत-ए-इफ्तार' कार्यक्रमातून अक्कलकोट शहराने सर्वधर्मसमभाव, बंधुभाव आणि सामाजिक ऐक्याचा आदर्श पुन्हा एकदा राज्यासमोर ठेवला. या कार्यक्रमात विविध धर्मीय नागरिकांनी एकत्र येत सामाजिक सलोख्याचा संदेश दिला.

भाजप अल्पसंख्याक सेलचे जिल्हाध्यक्ष फैजअहमद उर्फ नन्नू कोरबू मित्र परिवाराच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला आमदार सचिन कल्याणशेट्टी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी बोलताना त्यांनी अक्कलकोट ही सर्वधर्मीय ऐक्याची भूमी असून, येथे जपली जाणारी एकोप्याची परंपरा भविष्यातही कायम राहील, असा विश्वास व्यक्त केला.

या प्रसंगी हिंदू व मुस्लिम समाजातील नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, विविध संघटनांचे पदाधिकारी तसेच शहरातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी एकत्र येत सौहार्दपूर्ण वातावरण निर्माण करत सामाजिक ऐक्याचा आदर्श घालून दिला.

कार्यक्रमाला नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी, मैंदर्गीच्या नगराध्यक्ष अंजली बाजारमठ, अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले, उपनगराध्यक्ष ऋतुराज राठोड, नगरसेवक महेश हिंडोळे, अविनाश मडीखांबे, कांतू धनशेट्टी, मुस्तफा बळोरगी, उद्योगपती सिद्धाराम टाके, उत्तर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दीपक भिताडे, भाजपा प्रदेश सदस्य शिवसेना जोजन, सागर हिप्परगी, अजित सुतार, ॲड. विजय हर्डीकर, डॉ. रवींद्र बनसोडे, सेवानिवृत्त सपोनि सत्तार शेख, विक्रम शिंदे, माजी नगरसेवक सुनील सिद्धे, मल्लिनाथ आळगी, अंकुश चौगुले आदी उपस्थित होते.

सदर इफ्तार कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आईजम्मद कोरबू यांच्या नेतृत्वाखाली शकील नाईकवाडी, रशीद किस्तके, नगरसेवक नाविद डांगे आदींनी विशेष परिश्रम घेतले.

# उजनी प्रदूषणावर १०० कोटींची मागणी

## पर्यटन विकासासोबत शुद्धीकरणावर भर

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):** उजनी धरणाच्या पर्यटन विकासासाठी शासनाने ५४१ कोटी १८ लाखांचा आराखडा मंजूर केला असताना, त्यातील किमान १०० कोटी रुपये पाण्याचे प्रदूषण कमी करण्यासाठी खर्च करावेत, अशी मागणी आ. समाधान आवताडे यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात उपस्थित केली.

राज्यात पर्यटनवृद्धीसाठी विविध उपक्रम राबवले जात असून उजनी धरणावर राष्ट्रीय दजार्चे कृषी पर्यटनस्थळ उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र, विविध भागांतून येणाऱ्या रसायनमिश्रित सांडपाण्यामुळे धरणातील प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढत असून त्यामुळे आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण होत आहे. या पार्श्वभूमीवर पर्यटनासाठी मंजूर निधीपैकी १०० कोटी रुपये



प्रदूषण नियंत्रणासाठी वापरण्याची गरज असल्याचे आवताडे यांनी नमूद केले.

ते पुढे म्हणाले की, सोलापूर जिल्ह्याची अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणात उजनी धरणावर अवलंबून आहे. सिंचन व पाणीपुरवठा योजनांसाठी हे धरण महत्त्वाचे असून, पाण्याचे शुद्धीकरण आणि प्रदूषण नियंत्रणासाठी तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे. उजनी धरण सोलापूर, अहिल्यानगर आणि पुणे जिल्ह्यांमध्ये पसरले असून सुमारे १४५ किलोमीटर परिसर व्यापते. तसेच धरणाजवळून सोलापूर-पुणे राष्ट्रीय महामार्ग आणि कुटूंबाडी, भिगवणमार्गे जाणारा रेल्वेमार्ग असल्याने जलपर्यटनासाठी ही मोठी संधी आहे.

याशिवाय पंढरपूर, सोलापूर, अक्कलकोट आणि तुळजापूर ही प्रमुख तीर्थक्षेत्रे जवळ असल्याने उजनीचा पर्यटनस्थळ म्हणून विकास होणे गरजेचे आहे. मात्र, त्यासोबतच पाण्याचे शुद्धीकरण आणि पर्यावरण संवर्धनालाही प्राधान्य दिले पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले.

या प्रश्नावर उत्तर देताना कृषी, मदत व पुनर्वसन तसेच वित्त राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी, याबाबत लवकरच मुख्यमंत्र्यांसोबत बैठक घेऊन निर्णय केला जाईल, असे आश्वासन दिले.

# 'महाज्योती'त भ्रष्टाचाराचा भडका!

## हेमंत पाटील यांची भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील इतर मागास वगार्तील विद्यार्थ्यांचे भविष्य घडवण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या 'महाज्योती' अर्थात महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्थेत भ्रष्टाचाराचा आरोप अत्यंत गंभीर आहे. भ्रष्टाचाराचे आरोप असलेल्या अधिकाऱ्यांची तात्काळ हकालपट्टी करीत उच्चस्तरीय चौकशी समिती स्थापन करण्याची मागणी भारत अगेन्स्ट करप्शनचे राष्ट्रीय अध्यक्ष हेमंत पाटील यांनी बुधवारी (ता. १८) केली. यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देणार असल्याचे देखील पाटील यांनी सांगितले.

सत्ताधारी पक्षातील आमदारानेच महाज्योती मधील भ्रष्टाचार उघडकीस आणत त्यांची विधानसभेला दखल घेण्यास भाग पाडले. अशात या प्रकरणाचे गांभीर्य सरकारने लक्षात घ्यावे, असे पाटील म्हणाले. कौशल्य विकास प्रशिक्षणाचे काम विशिष्ट संस्थेला निविदा प्रक्रिया न काढताच देण्यात आले. जवळपास ५०० कोटींचा गैरव्यवहार यातून करण्यात



आल्याचा आरोप करण्यात आला आहे. अशात महाज्योती तसेच तत्सम संस्थांसंबंधी तक्रारींसाठी मंत्रालय स्तरावर स्वतंत्र कक्ष स्थापन करावे, अशी मागणी पाटील यांनी केली आहे.

भ्रष्टाचाराचे आरोप होत असतांना देखील बहुजन विकासमंत्री अतुल सावे संबंधित अधिकाऱ्यांची पाठराखण करताना दिसून येत आहेत, अशी खंत पाटील यांनी व्यक्त केली. भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे आश्वासन देण्याऐवजी सावे यांनी संबंधितांना घरचा रस्ता दाखवावा, असे आवाहन त्यांनी केले आहे. पारदर्शक तसेच प्रामाणिक अधिकाऱ्यांच्या हाती विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित संस्थांचा कारभार सरकारने द्यावा, अशी मागणी देखील पाटील यांनी केली.

# पत्रकारितेत कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभावी वापर : मुल्ला

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** वेगाने बदलणाऱ्या तंत्रज्ञानाच्या युगात कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence – AI) हे पत्रकारितेसाठी अत्यंत उपयुक्त साधन ठरत आहे. बातमी संकलन, माहितीचे विश्लेषण, व्हिडिओ-फोटो संपादन, डेटा अभ्यास आणि माहिती पडताळणी यांसारख्या विविध कामांमध्ये एआयचा प्रभावी वापर करून पत्रकारिता अधिक वेगवान, अचूक आणि परिणामकारक करता येते, असे मत ज्येष्ठ पत्रकार तथा एआयविषयक तज्ज्ञ मोहसीन मुल्ला यांनी व्यक्त केले.

डाटा लीड्स, गुगल, एशियन डेव्हलपमेंट बँक आणि एव्हीपीएन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असलेल्या एडीआयआरए या उपक्रमांतर्गत सोलापुरातील पत्रकारांसाठी सोलापूर श्रमिक पत्रकार संघाच्या वतीने आयोजित केलेली विशेष ऑनलाइन कार्यशाळा शनिवारी गुगल मीट द्वारे पार पडली. या कार्यशाळेत संपूर्ण सोलापूर जिल्ह्यातील माध्यमकर्मींसाठी एआयच्या संधी आणि उपयोगांविषयी तज्ज्ञ मोहसीन मुल्ला यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यशाळेदरम्यान मोहसीन मुल्ला यांनी पत्रकारितेत वापरता येणाऱ्या विविध एआय टूल्सची माहिती देत न्यूज रिसर्च, डेटा ॲनालिसिस, कंटेंट क्रिएशन, ग्राफिक्स डिजाईन, फोटो-व्हिडिओ एडिटिंग, हेडलाईन जनरेशन आणि फॅक्ट-चेकिंग यांसारख्या कामांमध्ये एआय कसा उपयोगी ठरू शकतो याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक दाखवले. बदलत्या डिजिटल युगात पत्रकारांनी नव्या तंत्रज्ञानाचा स्वीकार करून आपल्या कामाची गुणवत्ता वाढवणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच एआयचा वापर करताना विश्वसनीयता, नैतिकता आणि माहितीची पडताळणी या बाबींचे महत्त्वही त्यांनी अधोरेखित केले.

यावेळी पत्रकारांनी विचारलेल्या विविध शंका आणि प्रश्नांना मोहसीन मुल्ला यांनी अभ्यासपूर्ण उत्तरे दिली.

या कार्यशाळेला श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, सरचिटणीस सागर सुरवसे, खजिनदार किरण बनसोडे यांच्यासह सोलापूर जिल्ह्यातील पत्रकार मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या कार्यशाळेचे प्रास्ताविक संघाचे उपाध्यक्ष आफताब शेख यांनी केले तर सरचिटणीस सागर सुरवसे यांनी आभार मानले.

# अनुसूचित जाती आरक्षण वर्गीकरणाचा अध्यादेश त्वरित काढावा- सुरेश पाटोळे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण करून त्यानुसार त्यांना आरक्षण देण्यासंदभार्तील न्या. अनंत बदर समितीचा अहवाल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सोमवारी सादर करण्यात आला. या अहवालाची चर्चा लवकरच राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत करून निर्णय घेतला जाईल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले आहे.

सर्वोच्च न्यायालयाने १ ऑगस्ट २०२४ रोजी राज्यांनी अनुसूचित जातींचे मागासलेपणाच्या आधारावर वर्गीकरण करून त्यानुसार आरक्षणाचा लाभ द्यावा

असा निकाल दिलेला आहे. मात्र, त्याचे स्वरूप हे राज्याने निश्चित करावयाचे होते . त्यानुसार तत्कालीन महायुती सरकारने उच्च न्यायालयाचे निवृत्त न्या. अनंत बदर यांच्या अध्यक्षतेखाली उपवर्गीकरणाबाबत शिफारशी करण्यासाठी ऑक्टोबर २०२४ मध्येसमिती नेमली होती. या समितीला सप्टेंबर २०२५ मध्ये अहवाल देण्यास सांगितले होते, पण नंतर मार्च २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

न्या.अनंत बदर समितीने उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, राज्य मंत्री माधुरी मिसाळ आणि आमदार अमित गोरखे यांच्या उपस्थितीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना अखेर आपला



अहवाल सादर केला.

याबाबत माहिती देताना सकल मातंग समाज महाराष्ट्र राज्य समन्वयक तथा क्रांतिवीर लहुजी शक्ती सेना महाराष्ट्र राज्य प्रदेशाध्यक्ष सुरेश पाटोळे यांनी सांगितले की, " अनुसूचित जातीच्या आरक्षण वर्गीकरणासाठी आम्ही मागील पंचवीस वषार्पासून न्यायिक आणि प्रशासकीय पातळीवर लढा देत आहोत. यासाठी वेळोवेळी आंदोलने, धरणे आणि मोर्चे काढण्यात आले. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर महाराष्ट्र शासनाने न्या.बदर समिती स्थापन केली तिचा अहवाल आता शासनाला सादर करण्यात आला आहे.आरक्षण उपवर्गीकरण चळवळीतील सर्व कार्यकर्ते, समाज बांधव, आमदार मा. अमित गोरखे साहेब, समर्थन देणारे सर्व आमदार, मंत्री आणि विशेष मुख्यमंत्री मा.देवेंद्र फडणवीस यांचे सकल मातंग समाजाच्या वतीने विशेष आभार. आम्ही सकल मातंग समाज महाराष्ट्र राज्य तथा क्रांतिवीर लहुजी शक्ती सेना महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने मागणी करत आहोत की, बदर समितीचा अहवाल कॅबिनेट मध्ये ठेवून आरक्षण उपवर्गीकरणाचा सरळ अध्यादेश काढून उपवर्गीकरणाची लागलीच अंमलबजावणी सुरू करावी.

सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार आरक्षण उपवर्गीकरणात मातंग आणि वंचित जातींना प्राधान्य क्रमाची वागणूक देऊन काही अधिकचा न्याय बदर समितीने देण्याची अपेक्षा आहे. त्यावर आम्ही नजर ठेवून आहोत. बदर समितीच्या अहवालातून योग्य न्याय मिळाला नाहीतर तर सरकारकडे पाठपुराव्याची तयारी सुद्धा आम्ही केली आहे.

आरक्षण उपवर्गीकरणाची तात्काळ अंमलबजावणी होणे हे मातंग आणि सर्व वंचित जातीसाठी आवश्यक आहे. कारण सध्या मोठ्या प्रमाणावर मेघा नोकर भरती सुरू आहे. उपवर्गीकरण लागू झाले तर मेघा नोकर भरतीचा लाभ अनुसूचित जातीतील वंचित जातींना त्वरित मिळणार आहे. तसेच जून पासून शैक्षणिक वषार्ला सुरुवात होत असते. जून च्या अगोदर उपवर्गीकरण लागू झाले तर वैद्यकीय आणि सर्व तांत्रिक शिक्षणात आरक्षणाचा मोठा लाभ मिळण्यास सुरुवात होणार आहे." असे मत मातंग समाज नेते सुरेश पाटोळे यांनी सांगितले.

# आरोग्य उपकेंद्रातील अंशकालीन स्त्री परिचरांच्या मानधनात दुप्पट वाढ

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** सार्वजनिक आरोग्य विभागाच्या आरोग्य उपकेंद्रामध्ये कार्यरत असलेल्या अंशकालीन स्त्री परिचरांच्या मासिक मानधनात दुप्पट वाढ करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय सार्वजनिक आरोग्य विभागाने घेतला आहे. १ एप्रिल २०२६ पासून मानधनात वाढ करण्यात येणार असून याबाबतचा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे.

आरोग्य उपकेंद्रातील अंशकालीन स्त्री परिचर गाव पातळीवर, आदिवासी, दुर्गम, डोंगराळ भागात प्राथमिक स्वरुपाच्या आरोग्य सेवा तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी मदत करतात. तसेच आरोग्य विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या विविध आरोग्यविषयक कार्यक्रमांचा लाभ प्रत्येक कुटुंबापर्यंत पोहोचविण्यातही स्त्री परिचर महत्त्वाची भूमिका बजावत असतात. त्यांच्या कामाचे स्वरुप पाहता त्यांच्या मानधनात वाढ करण्याची मागणी लोकप्रतिनिधी व संघटनाकडूनही होत होती. अंशकालीन स्त्री परिचरांना 2019 च्या शासन निर्णयानुसार दरमहा तीन हजार रुपये मानधन अदा करण्यात येत होते. स्त्री परिचरांच्या कामाचे बदलते स्वरूप, आरोग्य सेवेतील वाढती भूमिका आणि वाढत्या महागाईचा विचार करता आरोग्यमंत्र्यांनी पुढाकार घेऊन स्त्री परिचरांच्या मासिक मानधनात तीन हजार रुपये वाढ केली असून आता त्यांना सध्याचे तीन हजार आणि प्रस्तावित वाढ तीन हजार रुपये असे एकूण सहा हजार रुपये मासिक मानधन १ एप्रिल २०२६ पासून देण्यात येणार आहे.

सर्व जिल्हा परिषदांनी अंशकालीन स्त्री परिचरांना प्रचलित कार्यपद्धतीनुसार सुधारित मासिक मानधन देण्याची कार्यवाही करावी. तसेच दरमहा दहा तारखेपर्यंत मासिक मानधनाची रक्कम अदा करण्याची कार्यवाही करावी. याबाबतचा शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभागाने नुकताच प्रसिद्ध केला आहे. या निर्णयामुळे राज्यभरातील अंशकालीन स्त्री परिचरांकडून समाधान व्यक्त होत आहे.

# दयानंद शिक्षण संस्थेत नूतन खा.डॉ. ज्योती वाघमारे यांचा सत्कार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** माझ्या जीवनात दयानंद शिक्षण संस्थेचे महत्व अनन्यसाधारण असे आहे. परिस्थितीचा बाऊ न करता प्रयत्न केल्यास यश नक्की मिळते. सोलापूरची लेक आणि दयानंद महाविद्यालयाची विद्यार्थिनी म्हणून मिळणारी ओळख अभिमानाची आहे. जीवनात ज्ञानाशिवाय पर्याय नाही. हे प्रत्येकाने जाणून आपले कार्य चालू ठेवणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन नूतन खा.प्रा.डॉ. ज्योती वाघमारे यांनी केले.

येथील डी.ए.व्ही. कॉलेज ट्रस्ट अँण्ड मॅनेजमेंट सोसायटी नवी दिल्ली संचलित, दयानंद शिक्षण संस्थेच्या वतीने राज्यसभेच्या नूतन खासदार ज्योती वाघमारे यांचा सत्कार करण्यात आला. खा.प्रा.डॉ. ज्योती वाघमारे पुढे म्हणाल्या, छत्रपती



शिवाजी महाराज व फुले, शाहू आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा जपत पुढील सहा वर्षात सामान्यांच्या प्रश्नांची सोडवणूक केली जाईल, असा विश्वास त्यांनी दिला.

यावेळी प्रशासक प्राचार्य डॉ.व्ही.पी. उबाळे यांनी खासदार प्रा.डॉ.ज्योती वाघमारे या आमच्या शिक्षण संस्थेच्या विद्यार्थिनी असल्याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे, असे सांगून त्यांना शुभेच्छा दिल्या. तर त्यांचे पीएच. डी. चे मार्गदर्शक प्रा. डॉ. टी.एन. कोळेकर यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी प्रा. आनंद मसलखांब व प्रा. गणेश सातालोलू यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला.

या कार्यक्रम प्रसंगी प्राचार्य डॉ. एस. बी. क्षीरसागर, प्राचार्य डॉ. बी. एच. दामजी, प्राचार्य डॉ. एस. व्ही. शिंदे, प्राचार्य डॉ. एस. जे. गायकवाड, लेखापाल विश्वनाथ बिराजदार यांची विशेष उपस्थिती होती. मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. डी. आर. गायकवाड यांनी उपस्थितांचे स्वागत व प्रास्ताविक केले.

# श्रीराम जन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळातर्फे शुक्रवारी हिंदू संमेलनाचे आयोजन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** श्रीराम जन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळातर्फे शुक्रवार दि. 20 मार्च रोजी हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती महामंडळाच्या उत्सव समितीचे अध्यक्ष डॉ. सूर्यप्रकाश कोठे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

श्रीराम नवमीच्या पावन पर्वानिमित्त महामंडळाच्यावतीने




उत्सव अध्यक्ष डॉ. सूर्यप्रकाश कोठे यांच्या नेतृत्वाखाली व संस्थापक अध्यक्ष सुधीर बहिरवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली ५१ प्रभू श्रीराम मूर्ती वाटप आणि विराट हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.

हा कार्यक्रम शुक्रवार, दि. 20 मार्च रोजी सायंकाळी 5 वाजता, चिल्ड्रन पार्क, वालचंद कॉलेज जवळ, कर्णिक नगर, सोलापूर येथे होणार आहे.या संमेलनास तेलंगणाचे आमदार राजासिंह ठाकूर, आमदार गोपीचंद पडळकर, समस्त हिंदू आघाडीचे अध्यक्ष मिलिंदभाऊ एकबोटे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

यावेळी राम रथाचे आगमन व पूजन सोहळाही होणार आहे. या सोहळ्यास सोलापूर शहर व परिसरातील सर्व रामभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ. सूर्यप्रकाश कोठे यांनी केले आहे.

या पत्रकार परिषदेस आनंद मुसळे, अमित राऊत, शिवराज गायकवाड, सुधीर बहिरवाडे, देविदास मिटकरी, संदीप जाधव उपस्थित होते.

# आई प्रतिष्ठानतर्फे दुर्धर आजारातग्रस्त मुलींना पौष्टिक आहार वाटप

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** दुर्धर आजारानेग्रस्त असलेल्या सुमारे ३५० गरजू मुली आणि महिलांना आई प्रतिष्ठानतर्फे पौष्टिक आहाराचे वाटप करण्यात आले. गुढीपाडवा आणि जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने राबविलेल्या आई प्रतिष्ठानच्या या कौतुकास्पद उपक्रमामुळे गरजूंचा गुढीपाडवा गोड झाला.

छत्रपती श्री शिवाजी महाराज शासकीय सर्वोपचार रुग्णालयातील डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या एआरटी प्लस सेंटरमध्ये बुधवारी हा कार्यक्रम झाला. प्रारंभी व्याहाती होम करून कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. याप्रसंगी व्यासपीठावर प्रभारी अधिष्ठाता डॉ. विद्या किरणकर, उपअधिष्ठाता डॉ. नरेश झंजाड, वैद्यकीय अधीक्षक डॉ. संपत तोडकर, वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. अग्रजा चिटणीस, आई प्रतिष्ठानच्या सृष्टी डांगरे



उपस्थित होते.

यावेळी दुर्धर आजारग्रस्त मुली आणि महिलांना पौष्टिक आहाराचे ३५० किट वाटण्यात आले. उपअधिष्ठाता डॉ. नरेश झंजाड म्हणाले, महिलांसाठी आई प्रतिष्ठान करत असलेले कार्य कौतुकास्पद आहे. दुर्धर आजारग्रस्त महिलांना पौष्टिक आहार देण्याची संकल्पना अत्यंत चांगली असून यातून महिलांना आर्थिक आणि मानसिक आधार मिळतो. वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. चिटणीस म्हणाल्या, दुर्धर आजाराबद्दल समाजात अनेक गैरसमज आहेत. ते दूर होण्याची आवश्यकता आहे. शासनाकडून आजारग्रस्तांना सर्वतोपरी सहाय्य करण्यात येते. औषधोपचाराने आजार बरा होत असल्यामुळे गरजू रुग्णांनी शासकीय रुग्णालयात उपचार घ्यावेत, असेही डॉ. चिटणीस याप्रसंगी म्हणाल्या.

आई प्रतिष्ठानच्या सृष्टी डांगरे म्हणाल्या, आई प्रतिष्ठानकडून दुर्धर आजारग्रस्त महिलांना कौशल्य विकास प्रशिक्षण, शिलाई प्रशिक्षण, संगणक, ब्युटी पार्लर तसेच इतर व्यवसायांचे प्रशिक्षण देण्याची व्यवस्था आहे. गरजू महिलांनी याचा लाभ घ्यावा. आपण उभारलेली गुढी फक्त आपल्या घरासाठी नाही,

तर समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या सन्मानासाठी असली पाहिजे.कोणताही आजार कोणाचं आयुष्य थांबवत नाही. तुम्हालाही स्वप्न आहेत, तुम्ही पुढे जाऊ शकता, आणि समाजात आपलं स्थान निर्माण करू शकतात. समाजातील प्रत्येक घटकाने एकमेकांचा आधार बनून समाजाचा विकास करणे आवश्यक असल्याचेही सृष्टी डांगरे यांनी याप्रसंगी सांगितले.

डॉ. अग्रजा चिटणीस यांनी प्रास्ताविक तर वैद्यकीय अधिकारी डॉ.सुनीता गायकवाड यांनी सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन केले.


## वैराग नगरपंचायत, वैराग

स्थापना १८/०५/२०२१ ता.बार्शी जि.सोलापूर Email- comcvairag1@gmail.com

आज़ादी का अमृत महोत्सव

जा.क्र.न.पं./३६१/२०२६ दि-१८/०३/२०२६

**वैराग नगरपंचायत वैराग**

**निविदा प्रसिद्धीकरण सुचना पहिली वेळ**

१. प्रभाग क्र.७ मठपती घर आणि संतनाथ मंदिर काँक्रीट रोड करणे (उर्वरित १८ मीटर लांबीचे काम करणे)

**वैराग नगरपंचायत वैराग**

**निविदा प्रसिद्धीकरण सुचना पाचवी वेळ**

१. आरोग्य विभागाकडील ट्रॅक्टरला ५००/६०० लिटर क्षमतेचे ब्लोअर (STP सह) बसविणे दरपत्रक मागविणे.

**वैराग नगरपंचायत वैराग**

**निविदा प्रसिद्धीकरण सुचना नववी वेळ**

१. नगरपंचायत कार्यालयात बॅटरी व इन्व्हर्टर खरेदी करणे.

वरील विषयांकित दरपत्रक / निविदेच्या अटी व सविस्तर निविदा सूचना तसेच अटी व शर्ती नगरपंचायत कार्यालयाकडील संबंधित विभागाकडे दि.१९/०३/२०२६ ते दि.३०/०३/२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहेत.

सही/-
(विद्या पाटील)
मुख्याधिकारी
वैराग नगरपंचायत वैराग